❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती रविवार, दि. ०४ ऑक्टोबर २०२६ ❖ पाने : ८ ❖ अंक : २७९ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com

दैनिक
संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक




आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताचा दणदणीत विजय!

फायनलमध्ये पाकिस्तानचा पराभव करत टीम इंडियाने जिंकले सुवर्णपदक

■ मुंबई (दै. संध्या)

आशियाई क्रीडा स्पर्धेत क्रिकेटच्या अंतिम सामन्यात भारताने पाकिस्तानचा १९ धावांनी पराभव केला. या विजयासह भारतीय संघाने सुवर्णपदकावर पुन्हा आपले नाव कोरले. पाकिस्तानला रौप्यपदक, तर श्रीलंकेला कांस्यपदक मिळाले. निशिनच्या कोरोगी स्पोर्ट्स पार्कमध्ये झालेल्या या सामन्यात भारतीय संघाने प्रथम फलंदाजी करत २० षटकांत ६ बाद २११ धावा केल्या. पाकिस्तानसमोर विजयासाठी २१२ धावांचे लक्ष्य होते. मात्र पाकिस्तानचा संघ २० षटकांत ६ बाद १९२ धावांपर्यंतच मजल मारू शकला. भारताचा कर्णधार श्रेयस अय्यरने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मात्र भारताची सुरुवात फारशी चांगली झाली नाही. वैभव सूर्यवंशी आणि संजू सॅमसन हे दोघेही लवकर बाद झाले. वैभवने ९ चेंडूंत १५ धावा केल्या, तर सॅमसनला केवळ २ धावा करता आल्या. यानंतर अभिषेक शर्मा आणि श्रेयस अय्यर यांनी डाव सावरला. दोघांनी तिसऱ्या विकेटसाठी ४२ धावांची भागीदारी केली. अभिषेकने आक्रमक फलंदाजी करत पाकिस्तानच्या गोलंदाजांवर दबाव निर्माण केला. अभिषेक शर्माने अवघ्या २८ चेंडूंत ६१ धावांची शानदार खेळी केली. त्याच्या या खेळीत ७ षटकार आणि ३ चौकारांचा समावेश होता. त्याच्या आक्रमक फलंदाजीमुळे भारताच्या धावसंख्येला वेग मिळाला. अभिषेक बाद झाल्यानंतर तिलक वर्माने डावाची जबाबदारी घेतली. त्याने अवघ्या २२ चेंडूंत नाबाद ५१ धावा केल्या. तिलकच्या फटकेबाजीमुळे भारताला २०० धावांचा टप्पा पार करता आला.



अमन सेहरावतची सुवर्ण झेप

भारतीय कुस्तीपटू अमन सेहरावतने २०२६च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत पुरुषांच्या फ्रीस्टाइल ५७ किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकावले. शनिवारी झालेल्या अंतिम सामन्यात अमनने उत्तर कोरियाच्या चोंग सोंग हान याचा पराभव केला. अंतिम सामन्याच्या सुरुवातीला अमनने बचावात्मक खेळ करत हानने डाव्या पायावर केलेले हल्ले यशस्वीपणे रोखले. सुरुवातीच्या काही मिनिटांत दोन्ही खेळाडूंना गुण मिळवता आले नाहीत. मात्र, अमनला निष्क्रियतेचा इशारा मिळाल्यानंतर हानला एक गुण देण्यात आला.

आशियाई क्रीडा स्पर्धेत ५७ किलो वजनी गटात भारताला कुस्तीत गोल्ड मेडल

■ मुंबई (दै. संध्या)


अमनने जोरदार पुनरागमन केले. त्याने लगेचच हानला खाली पाडत दोन गुण मिळवले. त्यानंतर अमनने आणखी एक शानदार टेकडाउन करत पहिल्या फेरीनंतर ४-१ अशी आघाडी घेतली.

दुसऱ्या फेरीच्या सुरुवातीलाच अमनने पुन्हा एकदा टेकडाउन करत आपली आघाडी ६-१ अशी वाढवली. मात्र, हानने हार मानली नाही. गुडघ्याला दुखापत झाल्यासारखे दिसत असतानाही त्याने दमदार पुनरागमन केले. त्याने टेकडाउन आणि रोलच्या माध्यमातून झटपट सहा गुण मिळवत अमनची ६-१ अशी आघाडी उलटवून ७-६ अशी आघाडी घेतली.

सामना हातातून निसटण्याची शक्यता निर्माण झाल्यानंतर अमनने जबरदस्त खेळी केली. त्याने टेकडाउनसाठी दोन आणि रोलसाठी आणखी दोन असे चार गुण मिळवत १०-७ अशी आघाडी पुन्हा मिळवली. त्यानंतर हानने माघार घेतल्याने अमनला आणखी एक गुण मिळाला.

शेवटच्या क्षणी अमनने आपली आघाडी कायम ठेवत सामना जिंकला आणि आशियाई क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदकावर नाव कोरले.

या विजयासह अमन सेहरावत हा या आशियाई क्रीडा स्पर्धेत कुस्तीमध्ये भारताला सुवर्णपदक मिळवून देणारा दुसरा खेळाडू ठरला. यापूर्वी शुक्रवारी सुजीत कालकलने सुवर्णपदक पटकावले होते. अमनने संपूर्ण सामन्यात सुरुवातीला मजबूत बचाव केला. त्यानंतर योग्य वेळी आक्रमक खेळ करत आघाडी मिळवली. दुसऱ्या फेरीत सहा गुण गमावल्यानंतरही त्याने संयम न गमावता निर्णायक डाव खेळला आणि भारतासाठी आणखी एक सुवर्णपदक निश्चित केले.





आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताची पदकांची कामगिरीही मजबूत राहिली आहे. कुमकुम मोहोड, प्रणवी उर्स आणि भारतीय पुरुष क्रिकेट संघानेही सुवर्णपदक पटकावले आहे. महिला सांघिक गोल्फमध्ये प्रणवी उर्स, अदिती अशोक आणि दीक्षा डागर यांनी रौप्यपदक मिळवले. पुरुषांच्या वैयक्तिक रिकर्व्ह तिरंदाजीत नीरज चौहानने कांस्यपदक जिंकले. कुस्तीमध्ये अमन सेहरावतने ५७ किलो गटात सुवर्णपदक मिळवले.

रामदास आखाडे खून प्रकरणी मोक्कातील सूत्रधार आरोपी निलेश आरते याचा जामीन मंजूर

■ उरुळी कांचन (दै. संध्या)

हॉटेल व्यवसायाच्या स्पर्धेतून उरुळी कांचन (ता. हवेली) येथील प्रसिद्ध गारवा हॉटेलचे मालक रामदास रघुनाथ आखाडे यांच्या खून प्रकरणातील मोक्का आरोपी नीलेश मधुकर आरते याला मुंबई उच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे.रायते याच्यावर लोणीकाळभोर व हडपसर पोलिस ठाण्यात एकूण २१ गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल असून गेली पाच वर्षे तो मोक्का अंतर्गत जेरबंद होता. न्यायालयाने आरतेला ५० हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर जामीन मंजुर केला आहे.आरोपी निलेश आरतेला जामीन मंजूर झाल्यानंतर या गुन्ह्यातील मोक्का अंतर्गत कारवाई झालेल्या आरोपींना न्यायालयाने जामीन मंजूर केले असून या प्रकरणातील मुख्य आरोपी बाळासाहेब खेडेकर याचा कारागृहातच मृत्यू झाला होता. उरुळी कांचन येथील गारवा हॉटेलच्या पोर्चमध्ये हॉटेल मालक रामदास आखाडे यांच्यावर दुचाकीवरून आलेल्या हल्लेखोरांनी धारदार हत्याराने १८ जुलै २०२१ रोजी रात्री पावणेनऊच्या सुमारास वार केले होते. या हल्ल्यात आखाडे गंभीर जखमी झाले



होते.उपचार सुरू असताना २१ जुलै रोजी त्यांचा मृत्यू झाला.याप्रकरणी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.या प्रकरणाच्या तपासादरम्यान पोलिसांनी बाळासाहेब जयवंत खेडेकर,निखिल बाळासाहेब खेडेकर,सौरभ ऊर्फ विम्या कैलास चौधरी,अक्षय अविनाश दाभाडे,करण विजय खडसे,प्रथमेश राजेंद्र कोलते,गणेश मधुकर माने,निखिल मंगेश चौधरी,नीलेश मधुकर आरते आणि काजल चंद्रकांत कोकणे यांच्यासह एका विधीसंघर्षित बालकाविरुद्ध कारवाई केली होती.

समृद्धी महामार्गावर धावत्या पिकअपचे चाक निखळले


• १७ मजूर जखमी, ९ जण गंभीर • पिकअपचे चाक निखळल्याने अपघात • तळेगाव दशासर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील घटना

■ भंडारा (दै. संध्या)

रोजगारासाठी बुलढाण्याच्या दिशेने निघालेल्या लाखांदूर तालुक्यातील मजुरांच्या पिकअप वाहनाला समृद्धी महामार्गावर भीषण अपघात झाला. धावत्या वाहनाचे पुढील डाव्या बाजूचे चाक अचानक निखळल्याने चालकाचे नियंत्रण सुटले आणि वाहन महामार्गावर उलटले. या अपघातात ९ मजूर गंभीर, तर ८ जण किरकोळ जखमी झाले. ही घटना शनिवारी (दि. ३) पहाटे ५ वाजताच्या सुमारास अमरावती जिल्ह्यातील तळेगाव दशासर पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडली.

अपघातानंतर जखमींच्या मदतीसाठी महामार्ग पोलिस आणि महाराष्ट्र सुरक्षा बलाच्या जवानांनी तातडीने धाव घेत बचावकार्य केले.

मिळालेल्या माहितीनुसार, भंडारा जिल्ह्यातील लाखांदूर तालुक्यातील मजुरांना घेऊन महिंद्रा पिकअप वाहन (क्रमांक एमएच ३७ टी ४१८३) भंडारा येथून बुलढाण्याच्या दिशेने जात होते. सोयाबीन, कापूस वेचणीच्या कामासाठी हे मजूर निघाले होते. समृद्धी महामार्गावरील मुंबई



कॉरिडॉरच्या चॅनेल क्रमांक १२७+२०० जवळ वाहन पोहोचले असता अचानक पुढील डाव्या बाजूचे चाक निखळले. त्यामुळे वाहन अनियंत्रित होऊन महामार्गावर उलटले. वाहनातील मजुरांना गंभीर दुखापती झाल्या. अपघातामुळे घटनास्थळी एकच गोंधळ उडाला. पोलिस पथकाने जखमींना बाहेर काढून तातडीने उपचारासाठी रवाना करण्याची व्यवस्था केली.

या अपघातात गंभीर जखमी झालेल्यांमध्ये मोहन शीरभाऊ, उषा शिवरकर, रीना रामटेके, कमोद भावे, बंडू उरकुडे, योगेश उरकुडे, संजय सोंदरकर, शांता सोनवणे आणि वंदना बुराडे यांचा समावेश आहे. किरकोळ जखमींमध्ये रोहित सहारे, अमर सहारे, स्वभा वाघमारे, विनोद रामटेके, अजय राऊत, अशोक कुंबले, महेंद्र शिवरकर आणि ललिता राऊत यांचा समावेश आहे.

सर्व १७ जखमींना तातडीने धामणगाव रेल्वे येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. कापूस वेचणीच्या हंगामात लाखांदूर तालुक्यातील अनेक मजूर रोजगारासाठी बाहेरगावी जातात. रोजगाराच्या शोधात निघालेल्या मजुरांच्या वाहनाला झालेल्या या अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. घटनेची माहिती मिळताच मजुरांचे नातेवाईक धामणगावकडे रवाना झाले आहेत.

प्रशासनात मोठा भूकंप : कारभाऱ्यांची उचलबांगडी

१५ IAS अधिकाऱ्यांसह ३८ बड्या अधिकाऱ्यांच्या तडकाफडकी बदल्या

■ मुंबई (दै. संध्या)

प्रशासकीय कामकाजाला गती देण्यासाठी आणि कायदा-सुव्यवस्थेसह प्रशासकीय घडी बसवण्यासाठी एकाच वेळी तब्बल १५ आयएएस (IAS) आणि २३ पीसीएस (PCS) अशा एकूण ३८ सनदी अधिकाऱ्यांच्या तडकाफडकी बदल्या करण्यात आल्या आहेत. अचानक निघालेल्या या आदेशांमुळे संपूर्ण प्रशासकीय वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली आहे. प्रशासनातील शिथिलता दूर करून यंत्रणा अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने उत्तर प्रदेशातील योगी सरकारने ही मोठी 'तबादला एक्सप्रेस' चालवली आहे. या फेरबदलात ११ अप्पर जिल्हाधिकाऱ्यांसह (ADM), दोन विद्यापीठांचे कुलसचिव, दोन उपसंचालक आणि मुख्य विकास अधिकाऱ्यांचा (CDO) समावेश आहे.

प्रमुख आयएएस अधिकाऱ्यांवर नव्या जबाबदाऱ्या :

शासनाने जारी केलेल्या अधिकृत यादीनुसार अनेक महत्त्वाच्या विभागांचे प्रमुख बदलण्यात आले आहेत

राकेश कुमार सिंह : अप्पर आयुक्त,



गृहनिर्माण व विकास परिषद

नीरज शुक्ला : व्यवस्थापकीय संचालक, पीसीएफ (PCF)

डॉ. चंद्रभूषण : अप्पर संचालक, प्रशासन व व्यवस्थापन अकादमी

सचिन कुमार सिंह : विशेष सचिव, वैद्यकीय विभाग

श्रीहरी प्रताप शाही : संचालक, पंचायती राज

अमित कुमार सिंह : व्यवस्थापकीय संचालक, पीसीडीएफ (PCDF)

प्रकाश बिंदू : सचिव, वैद्यकीय शिक्षण

माला श्रीवास्तव : संचालक, भूगर्भ आणि खनिकर्म विभाग

डॉ. उज्ज्वल कुमार : विशेष सचिव व संचालक, भूगर्भ आणि खनिकर्म

जे. रीभा : व्यवस्थापकीय संचालक, मेडिकल सप्लाय कॉर्पोरेशन

अर्चना गहरवार : कुलसचिव, डॉ. एपीजे अब्दुल कलाम तांत्रिक विद्यापीठ

रीना सिंह : कुलसचिव, किंग जॉर्ज वैद्यकीय विद्यापीठ (KGMU)

ध्रुव खाडिया : मुख्य विकास अधिकारी (CDO), मऊ

नरेंद्र बहादूर सिंह : मुख्य विकास अधिकारी (CDO), जौनपूर

विवेक कुमार श्रीवास्तव : सदस्य (न्यायिक), महसूल परिषद प्रयागराज

२३ पीसीएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा धडाका : आयएएस अधिकाऱ्यांनंतर प्रांतीय नागरी सेवेतील (PCS) अधिकाऱ्यांमध्येही मोठे फेरबदल करण्यात आले आहेत. यामध्ये चंद्रेश कुमार (देवरिया), ज्ञानेंद्र विक्रम (संत कबीरनगर), लवी त्रिपाठी (सहारनपूर), पुष्पेंद्र पटेल (रामपूर), प्रेमचंद्र मौर्य (प्रतापगड), रामजी मिश्रा (लखनौ), राजेंद्र कुमार (हरदोई), प्रफुल्ल त्रिपाठी (मुरादाबाद), ब्रिजेश त्रिपाठी (लखीमपूर), संगीता देवी (अलिगढ), गंभीर सिंह (मुझफ्फरनगर), नरेंद्र सिंह (आझमगढ) आणि आदित्य प्रजापती (मेरठ) या अधिकाऱ्यांची अप्पर जिल्हाधिकारी (ADM) पदावर नियुक्ती झाली आहे. तसेच राजेश कुमार यांची मेरठचे अप्पर मनपा आयुक्त, अर्पित गुप्ता यांची बांदा कृषी विद्यापीठाचे कुलसचिव, विजय शंकर यांची कुशीनगर कृषी विद्यापीठाचे कुलसचिव, अभिनव कन्नौजिया यांची संयुक्त दुग्ध आयुक्त, तर ब्रिजेश कुमार सिंह यांची मेरठ विकास प्राधिकरणाच्या सचिवपदी बदली झाली आहे. याशिवाय मयंक कुंडू यांना मुरादाबादचे उपजिल्हाधिकारी बनवण्यात आले असून, अनिरुद्ध प्रताप सिंह व अमित कुमार यांची मंडी परिषदेत नियुक्ती झाली आहे. दरम्यान, श्रीमती किंशुक श्रीवास्तव यांना प्रतीक्षा यादीत ठेवण्यात आले आहे.

जंतर-मंतरवरील आंदोलनात योगेंद्र यादव यांना पोलिसांनी घेतलं ताब्यात

कपिल सिब्बल, प्रशांत भूषणही आंदोलनात सहभागी

■ मुंबई (दै. संध्या)

मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणाविरोधात आणि केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी दिल्लीतील जंतरमंतर येथे २ ऑक्टोबरपासून सुरू असलेल्या आंदोलनाला मोठे वळण मिळाले आहे. या आंदोलनादरम्यान दिल्ली पोलिसांनी ज्येष्ठ राजकीय विश्लेषक व कार्यकर्ते योगेंद्र यादव यांना पुन्हा ताब्यात घेतले आहे. या आंदोलनात ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ व राज्यसभा खासदार कपिल सिब्बल, ज्येष्ठ वकील प्रशांत भूषण, स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडियाच्या अध्यक्ष नेहा बोरा आणि अविक साहा यांच्यासह अनेक वकिलांनी व युवकांनी प्रत्यक्ष सहभाग नोंदवत जंतरमंतरच्या दिशेने कूच केले. पोलिसांनी ताब्यात घेतल्यानंतर योगेंद्र यादव यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पोस्ट करत प्रशासनावर तीव्र संताप व्यक्त केला. त्यांनी लिहिले की, "पोलिसांची सर्व प्रकारची नाकेबंदी आणि धरपकड सुरू असतानाही जनतेने रस्त्यावर उतरून मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात आपला लढा सुरूच ठेवला आहे." पुढे त्यांनी 'Gyanesh Must Go!' असा इशारा देत '#JantarMantarSatyagraha' असा हॅशटॅगही जोडला. तसेच कपिल सिब्बल, प्रशांत भूषण, नेहा बोरा यांच्यासोबत आंदोलक शांततेने जंतरमंतरकडे कूच करताना एका व्हिडीओमध्ये दिसत आहेत. या व्हिडिओबाबत भूमिका मांडताना यादव यांनी स्पष्ट केले की, लोकशाहीत जंतरमंतरवर शांततापूर्ण मार्गाने निदर्शने करणे हा नागरिकांचा मूलभूत अधिकार आहे आणि पोलिसांच्या बळाचा गैरवापर करून हा हक्क कोणीही हिरावून घेऊ शकत नाही. दिल्लीतील एका वस्तीमध्ये ७२८ पैकी तब्बल ७२७ मतदारांची नावे कापल्याचे उघडकीस आल्यानंतर खुद्द राहुल गांधी यांनी त्या परिसराचा दौरा केला होता. याच मुद्द्यावरून २ ऑक्टोबर रोजी कॉकरोच जनता पार्टीने मुंबईतील शिवाजी पार्कवर मोठे आंदोलन करून ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी लावून धरली होती.



संपादकीय



सृष्टीच्या निर्मितीची संकल्पना

"हे विश्व निर्माण होण्यापूर्वी काय होते?"

हा प्रश्न माणसाला प्राचीन काळापासून पडत आला आहे. आधुनिक विज्ञानाने विश्वाच्या उत्पत्तीचा अभ्यास विविध सिद्धांतांच्या माध्यमातून केला आहे. पण भारतीय ऋषींनीही हजारो वर्षांपूर्वी या प्रश्नावर चिंतन केले होते.

ऋग्वेदातील 'नासदीय सूक्त' हे याचे सुंदर उदाहरण आहे. या सूक्तात सृष्टीच्या आरंभीच्या अवस्थेबद्दल प्रश्न विचारले जातात. त्या वेळी अस्तित्व आणि अनस्तित्व, प्रकाश आणि अंधार, दिवस आणि रात्र यांसारख्या परिचित संकल्पनाही आपल्या आजच्या अर्थाने अस्तित्वात नसल्याचे काव्यात्मक वर्णन केले जाते.आशा या आवर्त स्थिती मध्ये एक परमतत्व अस्तित्वात होते.त्याच्या श्वासातून ब्रम्ह उत्पत्ती झाली.ब्रम्ह म्हणजे देव नाही तर एक परमत्वातून उत्पन्न झालेली अवस्था आणि ॐ म्हणजे त्या परमत्वाच्या श्वास ध्वनी.

आणखी महत्त्वाची गोष्ट म्हणजे या सूक्ताचा शेवट निश्चित उत्तर देण्यापेक्षा प्रश्न विचारण्यात होतो—सृष्टीची निर्मिती नेमकी कशी झाली, हे सर्वोच्च स्तरावर कोण जाणतो? सनातन परंपरेने सृष्टिच्या उत्पत्तीचे एकच उत्तर देऊन प्रश्न बंद केला नाही तर सृष्टी पुर्वी काय होती? या प्रश्नापासून शोध सुरू केला.नासदिय सुक्ताने अज्ञात मान्य केले,तर माड्यूक्य उपनिषद आणि अन्यनी ते सत ब्रम्ह आणि ॐ पर्यंत नेले.त्यामुळे सनातन हिंदु विचार परंपरेचे वैशिष्ट्य केवळ श्रध्देत नाही,तर विश्वाच्या अस्तित्वाचा अर्थ शोधण्याच्या चिंतनात आहे.

हा दृष्टिकोन विचार करायला लावणारा आहे.

भारतीय परंपरेत सृष्टीच्या निर्मितीचे एकच वर्णन नाही. वेद, उपनिषदे आणि पुराणांमध्ये वेगवेगळ्या पद्धतीने विश्व, ब्रह्म, प्रकृती, पुरुष आणि सृष्टीचक्र यांचा विचार केला आहे.

उपनिषदांमध्ये 'ब्रह्म' ही अंतिम सत्याची संकल्पना येते. पुराणपरंपरेत ब्रह्मदेवाकडून सृष्टीची निर्मिती, विष्णूचे पालन आणि शिवाचा संहार अशा प्रतीकात्मक स्वरूपातून सृष्टीच्या चक्राचे वर्णन केले जाते.

यातील एक महत्त्वाची संकल्पना म्हणजे सृष्टी ही एकदाच निर्माण होऊन कायमची चालू राहणारी गोष्ट नसून निर्माण, स्थिती आणि लय यांचे चक्र असू शकते.

भारतीय कालगणनेत 'युग', 'मन्वंतर' आणि 'कल्प' यांसारख्या अतिशय मोठ्या कालमानांचा उल्लेख आढळतो. विशेषतः एका कल्पाची परंपरागत गणना ४.३२ अब्ज वर्षांशी जोडली जाते. ही धार्मिक-पुराणपरंपरेतील कालगणना आहे; तिची आधुनिक विश्वविज्ञानातील मोजमापाशी थेट समानता मानणे योग्य नाही. तरीही अब्जावधी वर्षांचा विशाल कालावधी कल्पनेत मांडण्याची भारतीय परंपरेची क्षमता निश्चितच लक्षवेधी आहे.

आधुनिक विज्ञान आज विश्वाचे वय अब्जावधी वर्षांचे असल्याचे सांगते. त्यामुळे प्राचीन भारतीय कालदृष्टी आणि आधुनिक विश्वाच्या प्रचंड कालमानात एक मनोरंजक साम्य जाणवते; परंतु धार्मिक कालगणना आणि आधुनिक वैज्ञानिक मापन या दोन वेगळ्या ज्ञानपरंपरा आहेत, हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

सृष्टीविषयी भारतीय विचाराची खरी ताकद कदाचित याच ठिकाणी दिसते—त्याने "विश्व कसे आहे?" एवढाच प्रश्न विचारला नाही; तर "या विश्वामागे अंतिम सत्य काय आहे?", "जीवाचे स्थान काय आहे?" आणि "या विशाल सृष्टीशी माणसाचे नाते काय?" असे प्रश्नही विचारले.

म्हणून हिंदू धर्मातील सृष्टीविचार हा केवळ सृष्टी कधी निर्माण झाली याचा प्रश्न नाही. तो अस्तित्वाचा, चेतनेचा आणि मानवाच्या स्थानाचा शोधही आहे. याच संदर्भातील एक अद्भुत विषय पाहूया— हिंदू धर्मातील युग, मन्वंतर आणि कल्प यांची विशाल कालगणना.

युग, मन्वंतर आणि कल्प — हिंदू धर्मातील विशाल कालगणना

आपण रोजचे जीवन दिवस, महिने आणि वर्षांमध्ये मोजतो. शंभर वर्षांचा काळ आपल्याला खूप मोठा वाटतो. पण भारतीय परंपरेने काळाकडे पाहताना मानवी आयुष्याच्या कितीतरी पलीकडे जाणारी कल्पना मांडली.

हिंदू कालगणनेत चार युगांचा उल्लेख येतो—सत्ययुग, त्रेतायुग, द्वापरयुग आणि कलियुग.

या चार युगांचे एकत्रित चक्र म्हणजे महायुग. परंपरागत गणनेनुसार त्याची एकूण लांबी ४३.२ लाख वर्षे मानली जाते.

अशा अनेक महायुगांचा समावेश मन्वंतरात आणि अनेक मन्वंतरांचा समावेश कल्पात केला जातो. एका कल्पासाठी ४.३२ अब्ज वर्षांची संख्या परंपरेत दिली जाते.

आज आपण पृथ्वीचे किंवा विश्वाचे वय अब्जावधी वर्षांत मोजतो. त्यामुळे भारतीय कालगणनेतील ही प्रचंड संख्यात्मक कल्पना आपले लक्ष वेधून घेते.

पण येथे एक महत्त्वाचा फरक समजून घेणे गरजेचे आहे.

पुराणांतील युग-मन्वंतर-कल्प ही धार्मिक आणि सांस्कृतिक कालगणना आहे. आधुनिक विज्ञानातील पृथ्वीचे व विश्वाचे वय हे निरीक्षण, भौतिकशास्त्र आणि खगोलशास्त्रीय पुराव्यांवर आधारित वैज्ञानिक मोजमाप आहे. दोन्हींची पद्धत वेगळी आहे. मात्र हजारो वर्षांपूर्वीच्या भारतीय विचारवंतांनी काळाचा विचार केवळ मानवी पिढ्यांपुरता न ठेवता लाखो आणि अब्जावधी वर्षांच्या प्रमाणात केला, ही गोष्ट नक्कीच विचारप्रवर्तक आहे.

भारतीय कालदृष्टीची दुसरी बाजू म्हणजे प्रत्यक्ष गणना.

वेदांग ज्योतिषात पाच वर्षांच्या 'युगाचा' वापर करून सूर्य आणि चंद्राच्या हालचालींवर आधारित कालगणनेचे नियम दिले होते. त्यात सौर महिने, चांद्र महिने, तिथी आणि नक्षत्रांचा विचार केला जात होता.

म्हणजेच कालगणना ही केवळ धार्मिक विधींची गोष्ट नव्हती; ती आकाशातील घटनांच्या निरीक्षणाशी जोडलेली होती.

आज आपण मोबाईलवर पंचांग पाहतो. पण त्या पंचांगामागे हजारो वर्षांच्या निरीक्षणांची आणि गणिताची परंपरा आहे, हे लक्षात घेतले तर त्या परंपरेचे महत्त्व अधिक जाणवते.


भारतीय संस्कृतीत काळाची ही व्यापक कल्पना आणि निसर्गातील चक्र यांचा जवळचा संबंध आहे. ऋतू बदलतात, चंद्राच्या कला बदलतात, सूर्याच्या स्थितीनुसार दिवस-रात्र बदलतात आणि माणसाचे जीवनही काळाबरोबर बदलते.

काळ आपल्याला एक महत्त्वाचा धडा देतो—माणूस कितीही मोठा झाला तरी तो काळाच्या विशाल प्रवाहातील एक छोटासा भाग आहे.

म्हणून हिंदू कालगणना केवळ मोठ्या आकड्यांची मालिका म्हणून पाहण्याऐवजी तिच्यामागील 'विशाल काळाची जाणीव' समजून घेणे महत्त्वाचे आहे.

आयुष्यात पुढे जाण्यासाठी स्पोर्ट्स कल्चर फार महत्त्वाचे

सिंधुताई सपकाळ यांच्या लेकींशी कृष्णराज महाडिक यांचा फेस टू फेस संवाद" | ममता बाल सदन संस्थेला दिली सदिच्छा भेट



■ सासवड (दै. संध्या)

मुलींनो स्वतःला कधीच कमजोर समजू नका. कारण आज महिला पुरुषांच्या बरोबरीने कर्तृत्व सिद्ध करू लागल्या आहेत. जर तुमच्या "लाईफमध्ये अप-डाऊन आले तर स्पोर्ट्समधून प्रेरणा मिळते. स्पोर्ट असे क्षेत्र आहे की जे तुम्हाला कायम स्फूर्ती आणि प्रेरणा देत राहील ज्यामुळे तुमच्यामध्ये शिस्त निर्माण होईल. मी स्वतः स्पोर्ट्समधून पुढे आलेलो आहे. त्यामुळे आयुष्यात पुढे जाण्यासाठी स्पोर्ट्स कल्चर फार महत्त्वाचे ठरते, असा विश्वास भारतीय जनता युवा मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांनी व्यक्त केला.

पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ माईंच्या मायेने आणि संस्कारांनी उभ्या राहिलेल्या ममता बाल सदन (बालगृह), कुंभारवळण येथे भारतीय जनता युवा मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांनी सदिच्छा भेट देऊन माईंच्या लेकींशी फेस-टू-फेस मनमोकळा संवाद साधला. मुलींनीही क्रीडा क्षेत्र, करिअर आणि भविष्यातील संधींबाबत उत्सुकतेने संवाद साधला. यावेळी क्रीडा क्षेत्रातील आपले अनुभव मुलींसमोर मांडले. शिक्षण, रोजगार, स्वावलंबन, सुरक्षितता, करिअर आणि जीवनातील अडचणींपासून ते मनाच्या तळातून आलेल्या प्रश्नांपर्यंत मुलींनी अनेक प्रश्न महाडिक यांच्यासमोर मोकळेपणाने मांडले.

यावेळी मुलींशी संवाद साधताना कृष्णराज महाडिक म्हणाले, "काही प्रश्न शिक्षणाचे असतील... काही रोजगाराचे असतील... काही स्वावलंबनाचे असतील... काही मुलींच्या सुरक्षिततेचे असतील... तर कदाचित एखादा प्रश्न अगदी मनाच्या तळातून आलेला असेल. कुठलाही प्रश्न असो, आपण मला मनमोकळेपणाने विचारा. मी आपल्या प्रश्नांची उत्तरे देण्याचा पूर्ण प्रयत्न करेन."'तुमच्यासारख्या मुलींच्या स्वप्नांना समाजाची साथ कशी मिळेल?" या प्रश्नाचे उत्तर केवळ शब्दांत नव्हे, तर संवादातून आणि संवेदनशीलतेतून मिळायला हवे, अशी भावना व्यक्त करत त्यांनी माईंच्या सर्व लेकींना आवाहन केले, "मनातला प्रश्न मनात ठेवू नका... आज मनमोकळेपणाने विचारा! कारण माईंच्या घरात प्रश्न विचारण्यासाठी परवानगी लागत नाही; इथे प्रश्न मायेने ऐकले जातात आणि उत्तरांना आधाराची जोड दिली जाते."या आवाहनानंतर मुलींनीही मनातील अनेक प्रश्न थेट महाडिक यांच्यासमोर मांडले.

महाडिक यांनी मुलींच्या प्रत्येक प्रश्नाला मनापासून आणि समर्पक उत्तरे देत त्यांच्या जिज्ञासेला प्रोत्साहन दिले. कार्यक्रमाच्या प्रारंभी पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ माईंच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. ममता बाल सदनचे अध्यक्ष दीपक गायकवाड यांच्या हस्ते कृष्णराज महाडिक यांचा शाल, श्रीफळ तसेच पिंपळ व तुळशीचे रोप देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमानंतर महाडिक यांनी ममता बाल सदन परिसराची पाहणी केली. त्यांनी संस्थेची गोशाळा आणि बेकरी यांना भेट देऊन तेथील कामकाजाची माहिती घेतली. माईंच्या कार्यातून उभ्या राहिलेल्या विविध उपक्रमांची त्यांनी आस्थेने पाहणी केली.

यावेळी पुणे व सासवड परिसरातील भाजपचे विविध पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमास अधीक्षिका स्मिता पानसरे, संचालक गोपाल गायकवाड, प्रसन्न गायकवाड, संजय गायकवाड, सुजाता गायकवाड, सरपंच मंजुषा गायकवाड, नाना कुंभारकर यांच्यासह ममता बाल सदनमधील मुली मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन जनसंपर्क अधिकारी मुकेश चौधरी यांनी केले.

असे विचारले प्रश्न ?

"एक चांगला नेता होण्यासाठी अभ्यास, वक्तृत्व, धाडस आणि संवेदनशीलता यापैकी कोणत्या गुणाला आपण सर्वाधिक महत्त्व देता?", "अनाथ किंवा वंचित मुलांना समाजात समान संधी मिळण्यासाठी युवकांनी कोणती भूमिका बजावली पाहिजे?", "आपल्या आई-वडिलांकडून मिळालेला असा कोणता संस्कार आहे, जो आपण आयुष्यभर जपता?", "ग्रामीण भागातील मुलींना उच्च शिक्षण आणि चांगल्या करिअरच्या संधी मिळाव्यात यासाठी शासन आणि समाजाने आणखी काय करायला हवे?", तसेच "महाराष्ट्रभर प्रवास करताना युवकांच्या कोणत्या प्रश्नाने आपल्याला सर्वाधिक विचार करायला लावले?" असे विविध प्रश्न मुलींनी विचारले. मुलींच्या प्रश्नांना सुद्धा त्यांनी तितकीच दिलखुलास उत्तरे दिली.

एसटी बसच्या धडकेत ७० वर्षीय वृद्धा गंभीर जखमी

■ नारायणगाव (दै. संध्या)



नारायणगाव येथील मीना नदीच्या पुलावर रस्ता ओलांडत असताना एका भरधाव एसटी बसने जोरदार धडक दिल्याने ७० वर्षीय वृद्ध महिला गंभीर जखमी झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या अपघातात यमुनाबाई चंद्रकांत गायकवाड(वय ७० वर्ष, रा. साकरनगरी, नारायणगाव) असे गंभीर जखमी झालेल्या वृद्ध महिलेचे नाव आहे. याप्रकरणी नारायणगाव पोलीस ठाण्यात एसटी चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना १ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७:०० वाजण्याच्या सुमारास घडली. फिर्यादी चंदा सुरेश शिरतर (वय ४७ वर्ष, रा. दत्तसोसायटी, आनंदवाडी, नारायणगाव), त्यांची आई यमुनाबाई आणि नातू हे नारायणगाव बसस्थानक ओलांडून मीना नदीच्या पुलावरून रस्त्याच्या डाव्या बाजूला जात होते. त्यावेळी फिर्यादी आणि त्यांचा मुलगा रस्ता ओलांडून पलीकडच्या बाजूला गेले. मात्र, यमुनाबाई या रस्त्याच्या कडेला येत असतानाच नारायणगाव बसस्थानकाकडून पुण्याच्या दिशेने जाणाऱ्या एका भरधाव एसटी बसने (एमएच १४ बीटी ८४०६) त्यांना जोराची धडक दिली. या भीषण धडकेत यमुनाबाई थेट एसटी बसच्या खाली गेल्या. अपघात घडताच परिसरातील स्थानिक नागरिकांनी तात्काळ प्रसंगावधान राखून बस थांबवली आणि यमुनाबाई यांना तातडीने गाडीखालून बाहेर काढले. या अपघातात त्यांना गंभीर दुखापत झाली असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे मीना नदीच्या पूल परिसरातील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती.

जुन्नर तालुका कबड्डी स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद



■ नारायणगाव (दै. संध्या)

समर्थ क्रीडा संकुल, बांगरवाडी-बेल्हे येथे जुन्नर तालुकास्तरीय शालेय कबड्डी स्पर्धा उत्साहात पार पडल्या. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जुन्नर तालुका क्रीडा शिक्षक संघटना आणि समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ गुरुकुल यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेत जुन्नर तालुक्यातील विविध शाळांमधील १४, १७ आणि १९ वर्षे वयोगटातील तब्बल १८४ मुला-मुलींच्या संघांनी सहभाग घेतला. खेळाडूंनी मैदानावर आक्रमकता, चढाया, बचाव कौशल्य, चपळता, संघभावना आणि शिस्तबद्ध खेळाचे प्रदर्शन केले. त्यामुळे संपूर्ण दिवसभर क्रीडा संकुलात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. स्पर्धेचे उद्घाटन संस्थेचे उपाध्यक्ष माऊली शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके, माजी जिल्हा परिषद सदस्या स्नेहल शेळके, समर्थ ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या वैशाली आहेर आणि समर्थ गुरुकुलचे प्राचार्य सतीश कुऱ्हे यांच्या हस्ते झाले. यावेळी मान्यवरांनी, विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच क्रीडा क्षेत्रातही सातत्याने प्रगती करावी, असे आवाहन केले. क्रीडेमुळे विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, नेतृत्वगुण, निर्णयक्षमता, संघभावना आणि आत्मविश्वास विकसित होण्यास मदत होते, असे यावेळी सांगण्यात आले.

विजेत्या आणि उपविजेत्या संघांना संस्थेचे सचिव विवेक शेळके आणि विश्वस्त वल्लभ शेळके यांच्या हस्ते समर्थ सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. खेळाडूंना पुढील क्रीडा वाटचालीसाठी शुभेच्छा देत पुढील स्तरावरील स्पर्धांसाठी आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी समर्थ शैक्षणिक संकुलाचे क्रीडा संचालक एच. पी. नरसुडे, क्रीडा शिक्षक सुरेश काकडे, विनायक व्हाडी आणि अश्विनी जगदाळे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच सहभागी शाळांचे क्रीडा शिक्षक, प्रशिक्षक, पंच, स्वयंसेवक आणि खेळाडूंच्या सहकार्यामुळे स्पर्धा सुरळीतपणे पार पडल्या.

विविध वयोगटातील विजेते व उपविजेते संघ

- १४ वर्षे मुले : प्रथम-गुरुवर्य रा. प. सबनीस विद्यालय, नारायणगाव, द्वितीय- शिवनेरी स्कूल, आर्वी .
- १७ वर्षे मुले : प्रथम-गुरुवर्य रा. प. सबनीस विद्यालय, नारायणगाव , द्वितीय-समर्थ ज्युनिअर कॉलेज, बेल्हे .
- १९ वर्षे मुले : प्रथम-छत्रपती ज्युनिअर कॉलेज,जुन्नर ,द्वितीय -समर्थ ज्युनिअर कॉलेज, बेल्हे.
- १४ वर्षे मुली : प्रथम - माध्यमिक विद्यालय,गुंजाळवाडी, द्वितीय -चैतन्य विद्यालय, ओतूर
- १७ वर्षे मुली : प्रथम-ज्ञानमंदिर हायस्कूल, द्वितीय - शंकरराव बुट्टे पाटील हायस्कूल, जुन्नर द्वितीय.
- १९ वर्षे मुली : प्रथम- गुरुवर्य रा. प. सबनीस ज्युनिअर कॉलेज, नारायणगाव, द्वितीय - बुट्टे पाटील विद्यालय, जुन्नर

राज्य उत्पादन शुल्क विभागाची धाड

■ ताडी विक्रीप्रकरणी कारवाई

■ मद्यविक्रीवरही किरकोळ कारवाई; कायमस्वरूपी दारूबंदीच्या गावात दारू मिळतेच कशी?



■ उरुळी कांचन (दै. संध्या)

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त २ ऑक्टोबर हा ड्राय डे असतानाच उरुळी कांचन परिसरात दारू आणि ताडीची विक्री सुरू असल्याची माहिती समोर आल्याने खळबळ उडाली आहे. या माहितीच्या आधारे राज्य उत्पादन शुल्क विभागाने उरुळी कांचन परिसरात धाड टाकून कारवाई केली. ताडी विक्रीप्रकरणी संबंधितावर कारवाई करण्यात आली असून, मद्यविक्रीसंदर्भातही कारवाई झाल्याची माहिती विभागाकडून देण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, उरुळी कांचन परिसरातील काही ठिकाणी दारू तसेच ताडी विक्री होत असल्याची माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाला मिळाली. त्यानंतर पथकाने संबंधित ठिकाणी तपासणी व धाडसत्र राबवले. या कारवाईत ताडी विक्री करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध कारवाई करण्यात आली. तसेच दारू विक्रीसंदर्भातही कारवाई करण्यात आली असून, ती किरकोळ स्वरूपाची असल्याचे विभागाकडून सांगण्यात आले. मात्र, या कारवाईमुळे आता अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. जर २ ऑक्टोबरला ड्राय डे होता, तर त्या दिवशी दारू किंवा ताडी विक्री सुरू असल्याची परिस्थिती निर्माणच कशी झाली? विक्री करणाऱ्यांवर नियमित पाळत ठेवली जात होती का? की कारवाई केवळ माहिती मिळाल्यानंतरच करण्यात आली?

अशा पार्श्वभूमीवर उरुळी कांचनमध्ये दारूविक्री होत असल्याचे समोर येणे ही केवळ ड्राय डेच्या नियमभंगाची बाब राहात नाही; तर गावाच्या दशकांपूर्वीच्या दारूमुक्तीच्या भूमिकेच्या अंमलबजावणीवरही प्रश्नचिन्ह निर्माण करणारी बाब ठरते. गांधी जयंतीच्या दिवशी मद्यविक्रीला निर्बंध असतानाही जर काही ठिकाणी दारू किंवा ताडी विक्री सुरू असल्याचे निदर्शनास येत असेल, तर ड्राय डेची अंमलबजावणी नेमकी कितपत प्रभावी आहे? असा सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. उरुळी कांचन परिसरात अवैध मद्यविक्री करणाऱ्या ठिकाणांवर नियमित पाळत ठेवली जाते का? संबंधित विभागाला अशा विक्रीची माहिती नागरिकांकडून मिळाल्यानंतरच कारवाई करावी लागते का? या प्रकारच्या विक्रीला कोणाचे संरक्षण किंवा अभय आहे का? यासह अनेक प्रश्नांची उत्तरे आता प्रशासनाने देणे आवश्यक आहे. संबंधित ठिकाणी नेमकी किती दारू किंवा ताडी आढळली? किती साठा जप्त करण्यात आला? किती व्यक्तींवर कारवाई करण्यात आली? कोणत्या कायदेशीर तरतुदींनुसार गुन्हा किंवा कारवाई करण्यात आली? तसेच यापूर्वी याच ठिकाणी अशा प्रकारची कारवाई झाली होती का? या सर्व बाबींचा अधिकृत तपशील राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून स्पष्ट होणे गरजेचे आहे. उरुळी कांचनमध्ये दारूविक्री कायमस्वरूपी बंद असल्याचे स्थानिक पातळीवर सांगितले जाते. असे असताना ड्राय डेच्या दिवशीच दारू मिळत असल्याची परिस्थिती निर्माण होत असेल, तर या विक्रीचे जाळे नेमके किती खोलवर आहे? हा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे.

ड्राय डे केवळ कागदोपत्री न राहता त्याची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, अवैध मद्यविक्रीच्या ठिकाणांवर नियमित कारवाई व्हावी आणि दारूविक्रीबाबतच्या तक्रारींची गांभीर्याने दखल घेतली जावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे. गांधी जयंतीच्या दिवशीच दारू-ताडी विक्रीविरोधात कारवाई झाली; पण या कारवाईनंतर उरुळी कांचनमधील अवैध मद्यविक्रीचा कायमस्वरूपी बंदोबस्त कधी होणार? हा प्रश्न आता प्रशासनासमोर उभा ठाकला आहे.

१. महाराष्ट्रातील उत्पादन शुल्काच्या नियमांनुसार २ ऑक्टोबर हा परवानाधारक मद्यविक्रीची ठिकाणे बंद ठेवण्याच्या दिवसांपैकी एक आहे. त्यामुळे गांधी जयंतीच्या दिवशीच उरुळी कांचनमध्ये मद्यविक्री सुरू असल्याचे निदर्शनास येणे ही बाब गंभीर मानली जात आहे.

२. शासन दप्तरी २९ एप्रिल १९६९ रोजी तत्कालीन सरपंच डॉ. मणिभाई देसाई यांच्या नेतृत्वाखाली १२ सभासदांच्या उपस्थितीत 'दारूमुक्त गाव' असे परिपत्रक ठराव मंजूरी असल्याचे जाणकार सांगतात

३. उरुळी कांचन येथे कायमस्वरूपी दारूबंदी असताना ड्राय डे दिवशी दारू मिळतेच कशी? याची जबाबदारी नेमकी कोणाची?" एका बाजूला गांधी जयंती, दारूमुक्तीचा संदेश आणि प्रशासनाचे निर्बंध; तर दुसऱ्या बाजूला त्याच दिवशी दारू-ताडी विक्रीप्रकरणी राज्य उत्पादन शुल्क विभागाची धाड

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

थोडक्यात पण महत्वाचे



अभिनव कला महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी प्रा. राहुल बोरावके यांची नियुक्ती

पुणे : दैनिक संध्या

कला क्षेत्रात मानाचे समजल्या जाणाऱ्या भारतीय कला प्रसारिणी सभा न्यासाकडून चालविल्या जाणाऱ्या पुण्यातील अभिनव कला महाविद्यालय टिळक पथच्या प्राचार्य पदी प्रा. राहुल बोरावके यांची नियुक्ती करण्यात आली आहे. दिनांक १ ऑक्टोबर २०२६ रोजी पासून त्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. प्राचार्य पदाच्या नियुक्तीचे पत्र संस्थेचे सचिव पुष्कराज भालचंद्र पाठक यांनी त्यांना दिले. प्रा. राहुल अशोकराव बोरावके यांनी A.T.D., GD Art App., Dip E Ad हे सर्व शिक्षण अभिनव कला महाविद्यालय येथून पूर्ण केले असून MFA डॉ बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ संभाजीनगर येथून पूर्ण केलेले आहे. या प्रसंगी सचिव पाठक म्हणाले, 'विद्यार्थी हित केंद्रस्थानी ठेऊन प्रा. बोरावके त्यांचे काम करतील ही अपेक्षा आहे. या पूर्वी मुंबईतील जहांगीर आर्ट गॅलरीला, त्यांचे कला प्रदर्शन संपन्न झालेले आहे. विद्यार्थी प्रिय शिक्षक म्हणून अशी प्रा. बोरावके यांची ख्याती आहे, अनेक वर्ष त्यांनी अभिनव कला महाविद्यालयात विभाग प्रमुख पदाचे काम सक्षमपणे केले आहे. प्राचार्य पदी निवड झाल्याबद्दल कला क्षेत्रातून त्यांना शुभेच्छा दिल्या जात आहे. प्रा. बोरावके म्हणाले, 'माझे महाविद्यालयातील शिक्षण अभिनव कला मध्येच झाले आहे आणि आमच्याच महाविद्यालयात प्राचार्यपदी काम करण्याची मला संधी दिल्याबद्दल सचिव पाठक आणि संस्था यांचा मी आभारी आहे. माझ्यासाठी नक्कीच हा भावनिक क्षण आहे. सध्याच्या ए.आय.च्या युगात देखील चित्रकारांच्या हातातील रेषांचे महत्व संपणार नाही असे त्यांनी म्हणताच विद्यार्थ्यांनी टाळ्यांचा कडकडाट झाला.

राष्ट्रपुरुषांना भव्य चित्रांद्वारे मानवंदना, जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट तर्फे आयोजन


पुणे : दैनिक संध्या



राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त, जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटस व जाधवर फाउंडेशन इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग, पुणे यांच्या वतीने ४० बाय ८० फूट आकारातील भव्य चित्रांद्वारे या राष्ट्रपुरुषांना अभिवादन करण्यात आले. नऱ्हे येथील संस्थेच्या प्रांगणात हा उपक्रम आयोजित करण्यात आला. या उपक्रमात तब्बल २०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत, आठवडाभर परिश्रम घेऊन दोन भव्य चित्रांची निर्मिती केली. ही चित्रे संस्थेतील विद्यार्थिनींनी तयार केली आहेत. संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. शार्दुल जाधवर यांच्या मार्गदर्शनाखाली साकारलेला हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला. राष्ट्रपुरुषांचे विचार आणि कार्य आजच्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा हा एक नाविन्यपूर्ण प्रयत्न करण्यात आल्याचे ॲड. शार्दुल जाधवर यांनी सांगितले.

शाळेच्या सहलीची धमालमस्ती ९ ऑक्टोबरला मोठ्या पडद्यावर

पुणे : दैनिक संध्या



शाळेची सहल म्हणजे धमालमस्ती आणि गमतीजमती... शाळेच्या सहलीशी संबंधित एक मनोरंजक कथा सहल या चित्रपटातून मोठ्या पडद्यावर येत आहे. चित्रपटाचा ट्रेलर लाँच करण्यात आला असून, ९ ऑक्टोबर रोजी हा चित्रपट सर्वत्र प्रदर्शित होणार आहे. के. स्वामिनी फिल्म प्रॉडक्शनच्या बॅनरखाली निर्मित या चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन मुकुंद वसंत खुपेरकर यांनी केले आहे. चित्रपटाचे निर्माते प्रशांत केसरकर आणि विलास केसरकर असून, सहनिर्माते मुकुंद वसंत खुपेरकर आहेत. मूळ पटकथा मुकुंद वसंत खुपेरकर यांनी लिहिली आहे. 'सहल'मध्ये देविका दफ्तरदार यांच्यासोबत सिद्धेश मुकुंद खुपेरकर, कल्याणी अडसुळ, आदित्य खुपेरकर, प्रज्वल सुतार, सेजल कोरे, सचिन मोरे, शिवाजी पाटील, रवि कदम यांच्या प्रमुख भूमिका आहेत. सिद्धेश मुकुंद खुपेरकर याचे या चित्रपटाच्या माध्यमातून मुख्य नायक म्हणून पदार्पण असून त्याने याआधी झी मराठीवरील प्रसिद्ध मालिका "तुझ्यात जीव रंगला" ह्यामध्ये लहान राणाच्या भावाची म्हणजेच सुरजची भुमिका साकारली होती, तसेच डॉ केशव हेगडेवार ह्यांची बाल भुमिका ही साकारली होती.चित्रपटाचे छायांकन अभिषेक शेटे यानी केले असून, संकलनाची जबाबदारी चंद्रशेखर गुरव यांनी सांभाळली आहे. सुहास मुंढे, समीर पठाण यांनी लिहिलेल्या गीतांना डॉ. जय भीम शिंदे यांचे संगीत दिग्दर्शन लाभले असून सुप्रसिद्ध गायक आदर्श शिंदे याच्या आवाजात चित्रपटातील गीत स्वरबद्ध करण्यात आले आहे. मुकुंद वसंत खुपेरकर यांनी कार्यकारी निर्माता, श्रेया चव्हाण यांनी वेशभूषा, आदित्य चव्हाण यांनी ध्वनिसंयोजन, तर प्रशांत कुंभार यांनी कला दिग्दर्शन केले आहे. एका शाळेतील मुलांची गणपतीपुळे येथे सहल जाणार असते. या सहलीला जाण्यासाठी पैसे द्यावे लागणार असतात. मात्र, या शाळेतील मुलांमध्ये असणारे अंतर्गत संघर्ष, विशेषतः मुलींवरून असणारे वादविवाद, सहलीसाठी पैसे देण्यास पालकांचा विरोध अशा कथासूत्रावर "सहल" हा चित्रपट बेतला आहे. आज पालक असलेल्यांना त्यांच्या शाळेच्या दिवसांची आठवण करून देणारी ही गोष्ट आहे. एका विद्यार्थ्यांच्या जडणघडणीमध्ये त्याचे पालक, शिक्षक आणि अर्थात सभोवतालचे वातावरण यागोष्टी महत्वपूर्ण असतात. शाळेत असतानाच निरागसपणा, समज-गैरसमज, त्या वयातला उत्साह, मुलीनबाबतचे आकर्षण हे सगळंच या गोष्टीतून पुन्हा एकदा अनुभवता येणार आहे. उत्तम कथानकाला दमदार अभिनयाची जोड आहे. त्यामुळे या सहलीचा अनुभव लक्षात राहणारा ठरेल. त्यासाठी आता ९ ऑक्टोबरपर्यंतच वाट पहावी लागणार आहे.

'हटके स्वामी समर्थ वंदना' मधून घडला भक्ती आणि संगीताचा संगम

■ पुणे (दै. संध्या)

स्वामी समर्थांच्या भक्तीचा आणि संगीताचा संगम घडविणारा 'हटके स्वामी समर्थ वंदना' हा विशेष संगीत सोहळा सदाशिव पेठेतील राजवाडे हॉल येथे झाला. गीत-संगीतकार संतोष अत्रे यांच्या संकल्पनेतून आणि संगीतबद्धतेतून साकारलेल्या १० नवीन स्वामी समर्थ भक्तिरचनांचा अल्बम यावेळी रसिकांसमोर सादर करण्यात आला. ज्येष्ठ अभिनेते मोहन जोशी यांच्या हस्ते अल्बमचे उद्घाटन करण्यात आले.

हटके म्युझिक ग्रुपच्या पुढाकाराने साकारलेल्या या अल्बमचे ऑडिओ-व्हिडिओ रेकॉर्डिंग गायत्री स्टुडिओज, पुणे येथे करण्यात आले आहे. कार्यक्रमात हटके ग्रुपचे सर्वेसर्वा शिरीष कुलकर्णी यांनी हटके स्वामी समर्थ वंदना या संकल्पनेमागील भूमिका आणि अल्बमच्या निर्मितीचा प्रवास मांडला. गीत-संगीतकार संतोष अत्रे यांनी कविता आणि संगीत यांचा परस्परसंबंध तसेच भक्तिगीतांच्या निर्मितीमागील प्रवास उलगडला. ज्येष्ठ स्वामी भक्त शरद पायगुडे यांनी स्वामी समर्थांचा महिमा आणि आध्यात्मिक व मूल्याधिष्ठित जाणीवेविषयी विचार व्यक्त केले. मोहन जोशी म्हणाले, स्वामींचे नाव घेणारा व्यक्ती जीवनात नक्कीच यशस्वी होतो. आज नाही तर उद्या त्याला यश मिळतेच. पूर्वी मी स्वामींचा भक्त नव्हतो. मात्र स्वामींचे नाव घेण्यास सुरुवात केल्यानंतर माझ्यात बदल झाला. आता दररोज स्वामींच्या मूर्तीची पूजा केल्याशिवाय मी इतर कामांना सुरुवात करत नाही. अल्बमच्या उद्घाटनानंतर त्यातील एका गीताचे ध्वनिमुद्रित



सादरीकरण करण्यात आले. अल्बमच्या निर्मितीत योगदान देणाऱ्या गायक-वादकांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर निवडक तीन ते चार भक्तिगीतांचे मूळ गायक कलाकारांनी प्रत्यक्ष सादरीकरण केले. या अल्बममध्ये रश्मी मोघे, राहुल जोशी, धवल चांदवडकर, अनुश्री घोरपडे, डॉ. ताम्हणकर यांच्यासह विविध गायक-वादकांनी योगदान दिले आहे. गीत-संगीत निर्मितीमध्ये संतोष अत्रे यांच्यासह विविध वादक आणि तंत्रज्ञांचे योगदान आहे. उपक्रमाविषयी शिरीष कुलकर्णी म्हणाले, भक्ती आणि संगीत यांचा संगम रसिकांच्या मनापर्यंत पोहोचवणे हा या संकल्पनेमागचा मुख्य उद्देश आहे. विविध कलाकारांनी एकत्र येऊन स्वामी चरणी अर्पण केलेली ही संगीतसेवा आहे. या गीतांचे पुढील एक वर्षात १०० प्रयोग करण्याचा संकल्प असून, हा हटके ग्रुपसाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरेल, असेही त्यांनी सांगितले.

दिग्दर्शक मनिष शिंदेचा "धाराऊ" चित्रपट २३ ऑक्टोबरपासून चित्रपटगृहांत

■ पुणे (दै. संध्या)

"धाराऊ... ती गाय नाय... माय हाय!" या लक्षवेधी टॅगलाइनसह दिग्दर्शक मनिष सुरेश शिंदे यांच्या आगामी "धाराऊ" या मराठी चित्रपटाचे मोशन पोस्टर नुकतेच सोशल मीडियावर प्रदर्शित झाले असून, पोस्टर प्रदर्शित होताच चित्रपटाची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. बुलढाणा अर्बन मीडिया हाऊस आणि हिंदचित्र फिल्म्स प्रस्तुत "धाराऊ" हा चित्रपट येत्या २३ ऑक्टोबर २०२६ रोजी महाराष्ट्रातील चित्रपटगृहांत प्रदर्शित होणार आहे. लेखक, पटकथाकार आणि दिग्दर्शक म्हणून मनिष सुरेश शिंदे यांचा हा पहिलाच मराठी चित्रपट असून, गोमातेप्रती असलेली श्रद्धा, भारतीय संस्कृतीतील तिचे महत्त्व आणि माणूस व गोमाता यांच्यातील भावनिक नात्याचा संवेदनशील वेध या चित्रपटातून घेण्यात आला आहे.



"धाराऊ"ची कथा, पटकथा, संवाद आणि दिग्दर्शन मनिष सुरेश शिंदे यांनी केले असून, श्री. राधेश्यामजी चांडक (भाईजी), डॉ. श्री. सुकेशजी झंवर आणि सौ. कोमलजी झंवर हे चित्रपटाचे निर्माते आहेत. चित्रपटाविषयी बोलताना दिग्दर्शक मनिष शिंदे म्हणाले, "लेखक आणि दिग्दर्शक म्हणून 'धाराऊ' हा माझा पहिलाच मराठी चित्रपट आहे आणि हा चित्रपट माझ्यासाठी खूप खास आहे. भारतीय संस्कृतीत गाईला केवळ एक प्राणी म्हणून पाहिले जात नाही, तर तिला आईसमान मानले जाते. याच भावनेला केंद्रस्थानी ठेवून गोमातेचे महत्त्व, तिच्याविषयीची संवेदना आणि समाजातील तिचे स्थान यांचा वेध घेण्याचा प्रयत्न 'धाराऊ'मधून करण्यात आला आहे. या विषयाच्या माध्यमातून समाजात जनजागृती आणि प्रबोधन निर्माण व्हावे, तसेच गोमातेशी संबंधित ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि सामाजिक संदर्भ नव्या पिढीपर्यंत पोहोचावेत, हा चित्रपटामागील प्रमुख उद्देश आहे." दिग्दर्शक मनिष सुरेश शिंदे यांच्यासाठी "धाराऊ" चित्रपट खास आहे कारण या चित्रपटाला विविध चित्रपट महोत्सवांमध्ये तब्बल १५ पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.

पथनाट्यातून स्वच्छता, व्यसनमुक्तीचा संदेश

■ पुणे (दै. संध्या)



महात्मा गांधी जयंतीनिमित्त नवक्षितिज संस्थेच्या मारुंजी आणि तळेगाव शाखांतील बौद्धिक अक्षम प्रौढ कलाकारांनी पथनाट्य आणि पदयात्रेतून स्वच्छता व व्यसनमुक्तीचा संदेश दिला. नागरिकांमध्ये सामाजिक विषयांबाबत जनजागृती करण्याबरोबरच बौद्धिक अक्षम व्यक्तींमधील आत्मविश्वासाला व्यासपीठ देण्याचा या उपक्रमाचा उद्देश होता.

हिंजवडीतील शिवाजी चौक आणि लक्ष्मी चौक येथे 'स्वच्छता ही सेवा' या विषयावर पथनाट्य सादर करण्यात आले. नितीन गायकवाड यांनी लेख प्रशासक न व दिग्दर्शन केले. पूजा गायकवाड यांनी मार्गदर्शन, तर भरत गायकवाड यांनी सहकार्य केले. नागेश, प्रखर, अमोल, विशाल, मिहीर, अंकुर, पौर्णिमा, मनाली, संध्या, अदिती आणि आदित्य यांनी भूमिका साकारल्या. शिवाजी चौकातील सादरीकरणानंतर कलाकारांनी जनजागृतीपर फलकांसह पदयात्रा काढत लक्ष्मी चौक गाठले आणि तेथेही पथनाट्य सादर केले.

नवक्षितिज संस्थेचे प्रशासक पांडुरंग आलुरकर म्हाले बौद्धिक अक्षम व्यक्तींना समाजाच्या मुख्य प्रवाहात सहभागी होण्यासाठी संधी मिळावी, त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा आणि त्यांच्यातील आत्मविश्वास वाढावा, या उद्देशाने नवक्षितिजकडून गेल्या १५ वर्षांपासून गांधी जयंतीनिमित्त हा उपक्रम राबविला जात आहे. या कार्यक्रमाला विशेष सहाय्य केल्याबद्दल एम क्युअर या कंपनीचे विशेष आभार मानले .हिंजवडी वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल सोनावणे यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांनी कलाकारांच्या आत्मविश्वासाचे आणि सादरीकरणाचे कौतुक केले.तळेगाव येथे 'नशामुक्ती' या विषयावर पथनाट्य सादर झाले. प्रतीक चव्हाण यांनी दिग्दर्शन केले, तर प्रथमेश गाड यांनी सूत्रसंचालन केले. कौशिक वैद्य, कुणाल शेवडे, वंश नेहरा, शंतनू अष्टीकर, प्रफुल ब्रह्मे, गौतम घाटे, विक्रांत अशेर आणि तुषार घाटे यांनी अभिनयातून व्यसनांचे दुष्परिणाम आणि व्यसनमुक्तीचा संदेश मांडला. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक तळेगाव वाहतूक विभाग, गणेश लोंढे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष डॉ. चंद्रशेखर देसाई आणि कार्यकारी विश्वस्त स्मिता शेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली यंदाचा उपक्रम पार पडला.

राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंती निमित्त पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने आदरांजली

■ पुणे (दै. संध्या)



राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारताचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंती निमित्त आज काँग्रेस भवन येथे पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटी पूर्व विभागाचे अध्यक्ष प्रशांत जगताप यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेस व महात्मा गांधी यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली.

यावेळी प्रशांत जगताप म्हणाले की, "अनेक देशांनी महात्मा गांधींच्या विचारांना मानले आहे. पण काही प्रवृत्तींकडून गांधींच्या मृत्यूनंतरही गांधींना मारण्याचा प्रयत्न केला जात आहे. गांधींनी मानवता, समता आणि नैतिकता या तीन मूलभूत मूल्यांवर भारतीय स्वातंत्र्यासाठी संघर्ष केला. शांततेच्या मार्गाने जनशक्तीचे दर्शन जगाला घडवून दिले. शेवटच्या माणसांचा प्रथम विचार गांधींनी केला. आज विविध मार्गांनी महात्मा गांधी यांचे विचार संपवण्याचा प्रयत्न केला जातोय, ही मोठी खंत आहे. भारताचे सर्वोच्च नेतेही परदेशात गेल्यावर महात्मा गांधी यांचे नाव घेऊन त्यांच्या पुतळ्याला वंदन करतात, मात्र काही अंधभक्त गांधींच्या विचारांची हत्या करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

साधी राहणी, प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा आणि देशभक्ती हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य होते. भारताचे पंतप्रधान म्हणून त्यांनी देशाला कठीण परिस्थितीत धैर्याने नेतृत्व दिले. १९६५ च्या भारत-पाकिस्तान युद्धाच्या काळात त्यांनी देशवासीयांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला. त्यांनी दिलेला "जय जवान, जय किसान" हा संदेश भारताच्या सुरक्षेसोबतच अन्ननिर्मिती करणाऱ्या शेतकऱ्यांचे महत्त्व अधोरेखित करणारा ठरला. जवान देशाचे रक्षण करतो, तर शेतकरी देशाचे पोट भरतो, हा व्यापक संदेश या घोषणेतून मिळतो.

महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या जीवनातून आपल्याला प्रामाणिकपणा, शिस्त, साधेपणा, कर्तव्यभावना आणि देशसेवा यांचे महत्त्व शिकायला मिळते. त्यांच्या जयंतीनिमित्त केवळ पुष्पहार अर्पण करून थांबणे योग्य नाही; त्यांच्या विचारांचा आपल्या दैनंदिन जीवनात स्वीकार करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल." यावेळी काँग्रेस विचार विभागाचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रविण डावर, प्रदेश खजिनदार ॲड. अभय छाजेड, प्रदेश प्रवक्ते गोपाळ तिवारी, उपाध्यक्ष कैलास गायकवाड, बाळासाहेब मारणे, नीता रजपूत, वैशाली धिमधिमे, डॉ. स्नेहल पाडळे, सीमा सावंत, अनुसया गायकवाड, आंदोली आदींसह असंख्य काँग्रेसजण उपस्थित होते.

सेवा सेतू अभियान : १७५० वीजग्राहकांची सौर ऊर्जेला पसंती

■ पुणे (दै. संध्या)

वीजग्राहकांना महावितरणच्या विविध सेवा तसेच केंद्र व राज्य शासनाच्या सौरऊर्जा योजनांची माहिती, मार्गदर्शन आणि अर्ज प्रक्रिया एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या 'सेवा सेतू अभियाना'ला पुणे परिमंडलात चांगला प्रतिसाद मिळत आहे. पुणे परिमंडलात १७२ ठिकाणी उभारलेल्या किऑस्कला आतापर्यंत तब्बल ३४६३ नागरिकांनी भेट देऊन विविध योजनांची माहिती घेतली, तर १७५० ग्राहकांनी छतावरील सौर प्रकल्पासाठी अर्ज केले आहेत.

पुणे व पिंपरी-चिंचवड या महानगरांत विविध वॉर्डमध्ये, तर ग्रामीण भागात तालुक्याच्या ठिकाणी सेवा सेतू अभियानांतर्गत महावितरणने किऑस्क उभारले आहेत. या ठिकाणी प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना, स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफटॉप सोलर (SMART) योजना, मागेल त्याला सौर कृषी पंप योजना तसेच मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० याबाबत नागरिकांना माहिती व मार्गदर्शन करण्यात येत आहे. योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे, ऑनलाइन अर्ज प्रक्रिया, अनुदान व आर्थिक लाभ, सौर संचाची क्षमता, अंदाजित खर्च, कर्ज सुविधा तसेच अधिकृत सौर कंत्राटदारांबाबत माहिती किऑस्कवर उपलब्ध करून देण्यात येत आहे.

सूर्यघर योजनेंतर्गत १ किलोवॅटला ३० हजार, २ किलोवॅटला ६० हजार, तर ३ किलोवॅट क्षमतेच्या प्रकल्पासाठी ७८ हजार रुपयांचे अनुदान मिळते. ज्या वीजग्राहकांचा मासिक वीज वापर १०० युनिटच्या आत आहे, अशा ग्राहकांना स्मार्ट योजनेतून लाभ घेता येतो. त्यासाठी सर्वसाधारण प्रवर्गासाठी १० हजार, अनुसूचित जाती-जमातींसाठी ५ हजार, तर दारिद्र्य रेषेखालील ग्राहकांना केवळ २५०० रुपयांत १ किलोवॅट क्षमतेचा प्रकल्प घराच्या छतावर लावता येतो. १ किलोवॅट क्षमतेच्या प्रकल्पातून सरासरी १२० युनिट वीज दरमहा तयार होते. यामुळे ग्राहकांचे वीजबिल शून्य होण्यास मदत होते.

जलतरण तलावातील घटनेची उच्चस्तरीय चौकशी करा : आमदार गोरखे

■ पुणे (दै. संध्या)

येरवडा येथील शासकीय प्रादेशिक क्रीडा संकुलातील जलतरण तलावात बुधवार, दि. 30 सप्टेंबर रोजी पोहण्यासाठी गेलेल्या मुलांना अचानक उलट्या, मळमळ व अस्वस्थतेचा त्रास झाल्याची अत्यंत गंभीर घटना घडली. या दुर्घटनेत सुमारे 10 मुलांना तातडीने वैद्यकीय उपचारासाठी रुग्णालयात दाखल करावे लागले. या अत्यंत गंभीर प्रकरणाची तातडीने उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी, अशी आक्रमक मागणी आमदार अमित गोरखे यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्याकडे केली आहे.

यापूर्वीच, दि. 27 जुलै 2026 रोजी आमदार अमित गोरखे यांनी पुणे विभागीय आयुक्तांकडे संबंधित क्रीडा संकुलातील प्रशासकीय अनास्था व कार्यपद्धतीशी संबंधित बाबींवर सखोल तपासणी व कारवाईची मागणी केली होती. मात्र, त्यानंतर अवघ्या दोन महिन्यांच्या कालावधीतच मुलांच्या आरोग्याशी व जीविताशी खेळ करणारी ही घटना घडल्याने तीव्र संताप व्यक्त होत आहे. यापूर्वी करण्यात आलेल्या तक्रारी व सूचनांवर संबंधित प्रशासनाने नेमकी काय कार्यवाही केली, याची कसून चौकशी होणे गरजेचे आहे.

आमदार अमित गोरखे यांनी याप्रकरणी कठोर कारवाईची मागणी केली आहे. 27 जुलै रोजी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिलेल्या बाबींवर प्रत्यक्षात कोणती कार्यवाही झाली? कोणत्या अधिकाऱ्याने



काय उपाययोजना केल्या? याची सविस्तर नोंद व स्वतंत्र तपास व्हावा. तलावातील क्लोरीन व अन्य रसायनांचे प्रमाण, डोसिंग यंत्रणा, साठवणूक व हाताळणी, पाण्याची नियमित प्रयोगशाळा तपासणी, तपासणी अहवाल, लॉगबुक, प्रशिक्षित कर्मचारी, लाइफगार्ड, आपत्कालीन वैद्यकीय सुविधा आणि सुरक्षा प्रोटोकॉलची सखोल तपासणी करण्यात यावी. घटनेच्या दिवशी तलावातील पाण्याचे नमुने घेऊन त्यांची स्वतंत्र प्रयोगशाळेत तपासणी करण्यात यावी आणि त्याचे अहवाल तातडीने सार्वजनिक करण्यात यावेत.

उपसंचालक स्तरावर अथवा इतर कोणत्याही स्तरावर कर्तव्यात कसूर, निष्काळजीपणा किंवा नियमांचे उल्लंघन आढळल्यास संबंधितांची जबाबदारी निश्चित करून नियमानुसार कठोर प्रशासकीय व कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी आमदार अमित गोरखे यांनी केली आहे. 'शासकीय जलतरण तलावामध्ये विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने येतात. त्यांच्या जीविताशी व आरोग्याशी संबंधित सुरक्षेच्या बाबतीत कोणतीही तडजोड होऊ नये. 30 सप्टेंबरची घटना ही केवळ एक स्वतंत्र घटना म्हणून न पाहता, या केंद्रातील संपूर्ण सुरक्षा व प्रशासकीय व्यवस्थेचे ऑडिट केले पाहिजे. यापूर्वी या स्विमिंग पूलमध्ये एका व्यक्तीचा मृत्य देखील झाला आहे ,' असे आमदार अमित गोरखे यांनी सांगितले.

विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने येतात. त्यांच्या जीविताशी व आरोग्याशी संबंधित सुरक्षेच्या बाबतीत कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही. दोषींवर कठोर कारवाई होईपर्यंत हा लढा सुरूच राहील. असे आमदार अमित गोरखे यांनी सांगितले.

थोडक्यात पण महत्वाचे



प्रा. डॉ. प्रज्ञा मनिष पंडित 'ठाणे गौरव' पुरस्काराने सन्मानित

ठाणे : दैनिक संध्या

तेजस्वी फाउंडेशन, ऑल इंडिया पोएट्री असोसिएशन, देवार्चनम् आणि ॥ प्रज्ञा स्तोत्र अध्ययन वर्ग ॥ या संस्थांच्या अध्यक्षा, संस्थापिका-संचालिका प्रा. डॉ. प्रज्ञा मनिष पंडित यांना सामाजिक, शैक्षणिक, साहित्यिक आणि धार्मिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल ठाणे महानगरपालिकेतर्फे 'ठाणे गौरव' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार नरेश म्हस्के, महापौर शर्मिला पिंपोळकर, तसेच अनेक नगरसेवक आणि मान्यवर उपस्थित होते. ठाणे महानगरपालिकेच्या ४४ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून ठाण्यातील राम गणेश गडकरी रंगायतन येथे आयोजित करण्यात आलेल्या दिमाखदार सोहळ्यात प्रा. डॉ. प्रज्ञा मनिष पंडित यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. ठाणे शहराच्या विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींचा गौरव या सोहळ्यात करण्यात आला. प्रा. डॉ. प्रज्ञा मनिष पंडित या गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक, शैक्षणिक, साहित्यिक आणि धार्मिक क्षेत्रात विविध उपक्रमांच्या माध्यमातून कार्यरत आहेत. तेजस्वी फाउंडेशनच्या माध्यमातून 'सेवा, संस्कार, समाजकार्य' या त्रिसूत्रीवर आधारित विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. वृद्धाश्रम, अनाथाश्रम, अन्नछत्र तसेच गरजू घटकांसाठी विविध प्रकारच्या मदतकार्यात फाउंडेशनचा सहभाग राहिला आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक उपक्रम, अंध विद्यार्थ्यांच्या वसतिगृहासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे, तसेच भटक्या श्वानांच्या आरोग्यविषयक उपक्रमांमध्येही संस्थेने सहभाग घेतला आहे. ॥ प्रज्ञा स्तोत्र अध्ययन वर्ग ॥ या माध्यमातून विविध स्तोत्रे, सहस्रनामावली आणि धार्मिक ग्रंथांचे अध्ययन, पठण व निरूपण यासाठी नियमित उपक्रम आयोजित केले जातात. विष्णुसहस्रनाम, गणपती सहस्रनाम, शिव सहस्रनाम, दत्त सहस्रनाम, श्रीसूक्त, देवीसूक्त, गणेशसूक्त आदींचे अध्ययन व निरूपण ऑनलाइन तसेच विविध धार्मिक स्थळी आयोजित करण्यात येते. आळंदी, जेजुरी, कोल्हापूर येथील विविध मंदिरे तसेच सिद्धिविनायक मंदिर येथे सहस्रनाम स्तोत्रांवर निरूपणासाठी त्यांना निमंत्रित केले जाते. अशा प्रकारे विविध धार्मिक स्थळी सहस्रनाम स्तोत्रांवर निरूपणासाठी निमंत्रित होणाऱ्या ठाण्यातील पहिल्या महिला निरूपणकार म्हणून त्यांची विशेष ओळख निर्माण झाली आहे. स्तोत्रांमागील अर्थ, भावार्थ आणि आध्यात्मिक आशय सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य त्या सातत्याने करीत आहेत. साहित्य क्षेत्रातही प्रा. डॉ. प्रज्ञा मनिष पंडित यांचे योगदान असून त्या विविध साहित्यिक उपक्रमांत सक्रिय आहेत. सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक विषयांवरील लेखनासोबतच साहित्यिक उपक्रम, पुस्तकनिर्मिती आणि विविध साहित्यिक कार्यक्रमांमध्ये त्यांचा सहभाग आहे. ऑल इंडिया पोएट्री असोसिएशनच्या माध्यमातूनही साहित्य क्षेत्राशी त्यांचा सक्रिय संबंध आहे. देवार्चनम्च्या माध्यमातून विविध धार्मिक मूर्ती आणि पूजा साहित्य उपलब्ध करून देण्याचे कार्य केले जाते. धार्मिक परंपरा, उपासना आणि संस्कार यांच्याशी संबंधित उपक्रमांना या माध्यमातून हातभार लावला जात आहे.

हे जल जीवन की कंत्राटदारांचे धन जीवन? तीन वर्षांत १७ कोटींची विल्हेवाट, पाणी मात्र गायब!

पुरंदर : दैनिक संध्या

पुरंदर तालुक्यातील पिलाणवाडी जलाशयावर आधारित शिवरी प्रादेशिक नळपाणीपुरवठा योजनेचे जलजीवन मिशनअंतर्गत नूतनीकरणाचे काम गेल्या तीन वर्षांहून अधिक काळापासून सुरू आहे. मात्र कोट्यवधी रुपये ओतूनही अद्यापही एकाही नळाला पाणी आलेले नाही. त्यामुळे हे जल जीवन नसून कंत्राटदारांचे धन जीवन तर नाही ना, असा संतप्त सवाल पुरंदरकर विचारत आहेत. पुरंदर तालुक्यातील शिवरी, खळद, साकुर्डे, तक्रारवाडी, एखतपूर, वाळुंज, निळुंज आणि बेलसर या आठ गावांसाठी पाईप विरहित १७.८७ कोटी रुपयांची योजना ७ नोव्हेंबर २०२२ रोजी मंजूर झाली. मूळ मुदत २७ महिने होती, मात्र काम रेंगाळल्याने मुदत आता २७ डिसेंबर २०२७ पर्यंत वाढवण्यात आली आहे. शिवरी, खळद, साकुर्डे, तक्रारवाडी आणि एखतपूर येथे पाईपलाईन व टाक्यांचे काम पूर्ण झाल्याचा दावा आहे. तर वाळुंज, निळुंज आणि बेलसर येथील काम अद्याप अपूर्ण आहे. त्यामुळे योजना कधी सुरू होणार, हेच गुलदस्त्यात आहे. योजनेतील सर्वात मोठा घोळ म्हणजे वैयक्तिक नळजोडणीसाठी एक रुपयाचीही तरतूद नाही. प्रत्येक जोडणीसाठी २५०० ते ३००० रुपये खर्च येणार असून, हा भार ग्रामपंचायतींवर टाकण्याचा डाव आहे. शासनाच्या IMIS प्रणालीनुसार एकूण ४२३८ कुटुंबांपैकी केवळ १०४७ कुटुंबांचीच अधिकृत नोंद आहे. उर्वरित ३१९१ कुटुंबांना नळ मिळणार कसा, हा सर्वात मोठा प्रश्न आहे. अनेक वाड्या-वस्त्यांना तर योजनेतून वगळण्यातच आले आहे. ऐन उन्हाळ्यात पिलाणवाडी जलाशय कोरडा पडतो, असा नागरिकांचा अनुभव आहे. मग वीर धरणासारखा सक्षम स्रोत असताना पिलाणवाडी का, असा सवालही उपस्थित होत आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मते काम प्रगतीपथावर आहे. तर उपअभियंता राजकुमार साठे म्हणाले, "नळजोडणीबाबत तरतूद नसेल तर ग्रामपंचायत स्तरावर विचार होईल, मोठा खर्च असेल तर शासनाचे मार्गदर्शन घेऊ."

पालघर येथे ज्येष्ठ नागरिक दिन साजरा

पालघर : दैनिक संध्या



सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, पालघर आणि श्रीकृष्ण महिला बालकल्याण व अपंग पुनर्वसन विकास मंडळ ह्यांच्या संयुक विद्यमाने व आनंद वृद्धाश्रम सेवा ट्रस्ट ह्यांच्या सौजन्याने १ ऑक्टोबर रोजी आंतरराष्ट्रीय ज्येष्ठ नागरिक दिवस साजरा केला. ह्या कार्यक्रमाला पालघर मधील ज्येष्ठ नागरिक, सेंट मेरी हाय स्कूल व ज्युनियर कॉलेज चे आणि सोनोपंत दांडेकर महाविद्यालय चे मानसशास्त्र विभागाचे विद्यार्थी, आनंद वृद्धाश्रमातील आजी आजोबा व युवा वर्ग असे मिळुन जवळपास २३०-२४० चा समुदाय उपस्थित होता. या कार्यक्रमाला श्री. पांडुरंग वाबळे, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय तर आजी केअर सेवक फाऊंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रकाश बोरगांवकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आपल्या आजी आजोबां बद्दल मनोगत व्यक्त केले व लघुनाट्य सादर केले. आनंद वृद्धाश्रमातील आजी आजोबांनी गाणी व नृत्य सादर केले. ह्या वेळी ७ ज्येष्ठ व्यक्तींचे सत्कार करण्यात आले जे अजुनही समाज उपयोगी कार्य करीत आहेत. ह्या वेळी विद्यार्थांनी प्रतिज्ञा घेतली की त्यांच्या घरातील व परिसरातील ज्येष्ठ व्यक्तींची ते काळजी घेतील व त्यांना सन्मानांनी जगण्यासाठी प्रयत्न करतील.श्री.प्रकाश बोरगांवकर ह्यांनी आंतरराष्ट्रीय ज्येष्ठ नागरिक दिवसाची पार्श्वभूमी व महत्त्व सांगून दोन्ही पिढींना intergenerational bonding वर मार्गदर्शन केले. आनंद वृद्धाश्रमाच्या विश्वस्त मनिषा कोटक ह्यांनी वृद्धाश्रमाची माहिती देऊन ज्येष्ठांचे कुटुंबातील व समाजातील महत्त्व यावर दोन्ही पिढींना मार्गदर्शन केले. प्रमुख अतिथी श्री. वाबळे यांनी सरकारच्या ज्येष्ठांसाठी असणाऱ्या विविध योजनांची माहिती दिली.

धर्म आणि राष्ट्र परस्परावलंबी, जगातील आव्हानांवर भारताच्या ज्ञानपरंपरेत मार्ग : सरसंघचालक डॉ. भागवत

■ मुंबई(दै. संध्या)



"राष्ट्राचा उद्देश धर्म आहे आणि धर्मच राष्ट्राला टिकवून ठेवतो. धर्म आणि राष्ट्र हे परस्परांवर अवलंबून आहेत. एकाचे अस्तित्व असेल तरच दुसऱ्याचे अस्तित्व टिकू शकते," असे प्रतिपादन प.पू. सरसंघचालक डॉ. मोहन जी भागवत यांनी केले. मुंबईतील बोरीवली येथे २ ऑक्टोबर रोजी आयोजित 'ऑल इंडिया विहार सेवा ग्रुप' च्या १४ व्या परिषदेत मोहन जी जैन तरुणांसह उपस्थितांना संबोधित करत होते. या प्रसंगी पद्मभूषण परम पूज्य आचार्य विजय रत्नसुंदरसूरि महाराज, आचार्य महाबोधी सूरीश्वरजी तसेच इतर आचार्य आणि मान्यवर उपस्थित होते.

आज जग विविध विरोधाभास, संघर्ष आणि टोकाच्या विचारसरणींमुळे अनेक आव्हानांना सामोरे जात आहे. या परिस्थितीत मानवतेला मार्गदर्शन करण्याची क्षमता भारताच्या प्राचीन ज्ञानपरंपरेत आहे. त्यामुळे जग आज भारताकडे आशेने पाहत आहे, असे मोहनजी यांनी नमूद केले. भारताने आपल्या ज्ञानाचा प्रसार कधीही अन्य देशांवर आक्रमण करून किंवा सक्तीने धर्मपरिवर्तन घडवून केलेला नाही. उलट, मानवकल्याणाच्या निःस्वार्थ भावनेतून भारताने आपले ज्ञान जगाला दिले आहे. हीच भारताच्या ज्ञानपरंपरेची वैशिष्ट्यपूर्ण ओळख आहे, असे ही त्यांनी सांगितले.

वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत आणि भगवद्गीता यांसह जैन आगम, त्रिपिटक आणि गुरुग्रंथ साहिब यांसारख्या महान ग्रंथांमध्ये मानवतेला दिशा देणारे व्यापक ज्ञान सामावलेले आहे. संतांच्या शिकवणुकीतूनही मानवकल्याण, समरसता आणि सेवाभावाचा संदेश मिळतो. या ज्ञानसंपदेची आज संपूर्ण जगाला आवश्यकता आहे, असे मोहनजी यांनी स्पष्ट केले.भारताच्या या महान ज्ञानपरंपरेचे संरक्षण करणे आणि ती पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवणे ही केवळ धार्मिक जबाबदारी नाही, तर संपूर्ण मानवतेप्रती असलेले कर्तव्य आहे. संतपरंपरा आणि सेवाभावी वृत्तीचे जतन म्हणजे मानवी समाजाच्या सुरक्षित आणि कल्याणकारी भविष्याचे जतन होय, असेही त्यांनी प्रतिपादन केले.

याप्रसंगी विहार सेवक आणि इतर उपस्थितांना संबोधित करताना पद्मभूषण परम पूज्य आचार्य श्रीमद् विजय रत्नसुंदरसूरि महाराजा म्हणाले की, "देशाची संस्कृती संपली तर देश संपायला वेळ लागत नाही. त्यामुळे देशाची संस्कृती वाचवणे आणि तिचे जतन करणे गरजेचे आहे आणि हे केवळ आपल्या संस्कारांमुळे शक्य होईल. राष्ट्र वाचले तर धर्म वाचेल आणि धर्म वाचला तर आपण सुरक्षित राहू." तसेच राष्ट्र सुरक्षा, संस्कृती रक्षणासाठी आम्ही संघासोबत असल्याचे महाराजांनी अधोरेखित केले.'ऑल इंडिया विहार सेवा ग्रुप' देशभरात पायी प्रवास करणाऱ्या जैन साधूंचा प्रवास सुरक्षित आणि अपघात विरहित होण्यासाठी मदत करतो. पद्मभूषण परम पूज्य आचार्य श्रीमद् विजय रत्नसुंदरसूरि महाराज यांनी आतापर्यंत ५०० पेक्षा जास्त पुस्तके लिहिली आहेत. आज यांच्या 'आनंद यात्रा-अठराह कर्तव्य' या ५३६ व्या पुस्तकाचे प्रकाशन मोहनजी भागवत यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

'अभिजात' दर्जा; मग एसटीच्या 'स्मार्ट कार्ड'वर मायबोलीचा विसर का?

■ मुंबई : (दै. संध्या)



एसटी महामंडळाकडून ज्येष्ठ नागरिक व महिलांना मिळणाऱ्या सवलत ओळखपत्रांवर सर्व तपशील केवळ इंग्रजीत असल्याने ग्रामीण नागरिक व ज्येष्ठांची मोठी अडचण होत आहे. याबाबत राज्यभरातून अनेक प्रवाशांच्या तक्रारी प्राप्त झाल्याच्या बाबीला एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांनीही दुजोरा दिला आहे. या समस्येचे गांभीर्य लक्षात घेऊन सर्व सवलत ओळखपत्रे मराठी आणि इंग्रजी (द्विभाषिक) करण्यात यावीत, या मागणीचे निवेदन 'सुराज्य अभियान'तर्फे एसटीच्या मा. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालकांना सादर करण्यात आले. या निवेदनाची तात्काळ नोंद घेत व्यवस्थापकीय संचालकांनी संबंधित अधिकाऱ्यांना या विषयावर त्वरित योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

या संदर्भात बोलताना 'सुराज्य अभियान'चे महाराष्ट्र राज्य समन्वयक श्री. अभिषेक मुरुकटे म्हणाले, "महाराष्ट्र राजभाषा नियमांनुसार शासकीय कारभारात मराठीचा वापर अनिवार्य आहे, तसेच केंद्र सरकारने मराठीला 'अभिजात भाषा' दर्जा दिला आहे. हा बहुमान आणि प्रवाशांची अडचण विचारात घेता एसटीची ओळखपत्रे द्विभाषिक करणे आवश्यक आहे. यामुळे स्थानिकांची सोय होऊन राजभाषेचा सन्मानही राखला जाईल."

प्रशासकीय स्तरावर मिळालेल्या सकारात्मक प्रतिसादानंतर या बाबत तातडीने अंमलबजावणी व्हावी, अशी अपेक्षा सुराज्य अभियानाने व्यक्त केली आहे. एसटी महामंडळाच्या सर्व सवलत ओळखपत्रांवर प्रवाशांचे नाव, तपशील व नियम मराठी आणि इंग्रजी (द्विभाषिक) अशा दोन्ही भाषांमध्ये मुद्रित करण्यात यावेत.

कॅम्प एज्युकेशन सोसायटीच्या हॉटेल मॅनेजमेंट इन्स्टिट्यूटमध्ये स्वागत

■ पुणे : (दै. संध्या)



कॅम्प एज्युकेशन सोसायटीच्या डॉ. अरविंद ब. तेलंग इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंटच्या प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमास बिग बाईट बिर्याणी संस्थेच्या माजी विद्यार्थिनी स्नेहल ओगले तसेच संस्थेचे प्राचार्य डॉ. अजयकुमार एम. राय प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या रॅम्प वॉक, प्रश्नोत्तर फेरी आणि परिचय सादरीकरणाच्या आधारे अथर्व सुशांत माडव याची मिस्टर फ्रेशर्स आणि आर्या श्रीकृष्ण धुमाळ हिची मिस फ्रेशर्स म्हणून निवड करण्यात आली.

यावर्षीच्या डिस्को थीमला अनुसरून विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नृत्याने कार्यक्रमात उत्साहाचे वातावरण निर्माण केले. प्रमुख अतिथी स्नेहल ओगले यांनी विद्यार्थ्यांना हॉस्पिटॅलिटी क्षेत्रातील करिअरच्या विविध संधींबाबत मार्गदर्शन केले. प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांना संस्थेतील शिक्षक व विद्यार्थ्यांची ओळख व्हावी.

श्रमप्रतिष्ठेचा सन्मान हेच महात्मा गांधींना खरे अभिवादन!

■ पुणे : (दै. संध्या)

सत्य, अहिंसा, समानता आणि श्रमप्रतिष्ठेचे विचार आपल्या जीवनात अंगीकारणे, हेच राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना खऱ्या अर्थाने अभिवादन ठरेल, असे प्रतिपादन ज्येष्ठ नेते उल्हासदादा पवार यांनी केले. स्वच्छ भारताचा विचार महात्मा गांधी यांनी केवळ स्वच्छ रस्ते आणि परिसरापुरता मर्यादित ठेवला नव्हता, तर स्वच्छता ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे, असा संदेशही त्यांनी दिला होता, असेही त्यांनी नमूद केले.

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून राष्ट्रीय मजदूर संघाच्या वतीने गणेशोत्सव काळात स्वच्छता व्यवस्थेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा सन्मान सोहळा गुरुवार, दि. १ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजता पुणे पत्रकार भवन येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात उल्हासदादा पवार बोलत होते.

यावेळी पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त संतोष वारुळे, आरोग्य निरीक्षक आणि मुकादम यांचा ज्येष्ठ नेते उल्हासदादा पवार आणि पुणे महानगरपालिकेचे सभासद व राष्ट्रीय मजदूर संघाचे अध्यक्ष सुनील शिंदे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी अहोरात्र कष्ट करणाऱ्या प्रत्येक स्वच्छता कर्मचाऱ्याच्या श्रमाचा आणि योगदानाचा सन्मान होणे आवश्यक आहे. त्यांच्या कामाकडे केवळ नोकरी किंवा कर्तव्य म्हणून न पाहता, त्यांच्या श्रमाचे महत्त्व ओळखणे ही आपली सामाजिक जबाबदारी आहे. याच भावनेतून राष्ट्रीय मजदूर संघाच्या वतीने या सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले, असे मत राष्ट्रीय मजदूर संघाचे अध्यक्ष सुनील शिंदे यांनी व्यक्त केले. सत्काराला उत्तर देताना घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त संतोष वारुळे म्हणाले, "हा सन्मान केवळ माझा वैयक्तिक सन्मान नसून पुणे महानगरपालिकेतील सर्व स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या कामाचा आणि योगदानाचा सन्मान आहे. शहर स्वच्छ ठेवण्यासाठी स्वच्छता कर्मचारी सातत्याने मेहनत घेत असतात. त्यांच्या कार्याची दखल घेऊन राष्ट्रीय मजदूर संघाने हा सन्मान सोहळा आयोजित केला, ही आनंदाची बाब आहे."

मंचरमध्ये सोन्याचे दागिने चोरणारी आंतरजिल्हा टोळी जेरबंद

■ नारायणगाव: (दै. संध्या)



मंचर एसटी बसस्थानक परिसरात तसेच एसटी बसमध्ये महिलांच्या सोन्याच्या दागिन्यांची चोरी करणाऱ्या आंतरजिल्हा टोळीला पुणे ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने आणि मंचर पोलिसांनी अटक केली आहे. या कारवाईत पोलिसांनी चार तोळे वजनाचे, सुमारे ४ लाख ९० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने जप्त केले आहेत. या टोळीतील तिघांना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून चोरीचे दोन गुन्हे उघडकीस आले आहेत.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री.संदीप सिंह गिल्ल यांनी स्थानिक गुन्हे शाखा आणि मंचर पोलिसांना विशेष सूचना दिल्या होत्या. त्यानुसार पोलिसांची पथके गस्त घालत असताना मंचर एसटी बसस्थानकात महिलांच्या सोन्याच्या दागिन्यांची चोरी करणारी टोळी येणार असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली.

या माहितीच्या आधारे पोलिसांनी मंचर एसटी बसस्थानक परिसरात सापळा रचला. यावेळी संशयास्पदरीत्या फिरणाऱ्या अशोक बबन भोसले (रा. कासारी, ता. आष्टी, जि. बीड, सध्या रा. हिवरगाव फाटा, ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर) याला ताब्यात घेऊन चौकशी केली. चौकशीदरम्यान त्याने अश्विनी अविनाश भोसले हिच्या मदतीने मंचर एसटी बसस्थानक परिसरात आणि बसमध्ये महिलांच्या गळ्यातील तसेच पिशव्यांमधील सोन्याचे दागिने चोरल्याची कबुली दिली.

त्यानंतर पोलिसांनी अशोक बबन भोसले, अश्विनी अविनाश भोसले (रा. माहिजळगाव, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर) आणि सतीश मधुकर गोरे (रा. शिवाजीनगर, जामखेड, ता. जामखेड, जि. अहिल्यानगर) या तिघांना अटक केली. त्यांच्याकडून मंचर पोलीस ठाण्यात गु.र.नं.१४१२०२६ बी.एन.एस.कलम ३०३(२), गु.र.नं.१२०/२०२६ बी.एन.एस. कलम ३०३(२) प्रमाणे दाखल असलेल्या दोन चोरीच्या गुन्ह्यांतील चार तोळे वजनाचे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले आहेत. या कारवाईमुळे चोरीचे दोन गुन्हे उघडकीस आले आहेत.

ही कारवाई पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक मा.श्री.संदीप सिंह गिल्ल, अपर पोलीस अधीक्षक मा.श्री.शुभम कुमार, खेड विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी मा. श्री अमोल मांडवे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री.प्रमोद क्षीरसागर आणि मंचर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या कारवाईत महादेव शेलार, शरद बांबळे, संदीप फड, स्वप्नील गाढवे, हनुमंत ढोबळे, अतुल डेरे सुदाम घोडे, संजय नाडेकर, शेखर भोईर, योगेश रोडे, अजित पवार, विनोद जांभळे आणि पोलीस कर्मचारी अलिशा शेख यांनी सहभाग घेतला.

मालवणी ठसका, मिश्कील अंदाज आणि प्रेमात पडलेल्या 'भाई'ची भन्नाट कहाणी

■ मुंबई (दै. संध्या)

मालवणी भाषेचा खट्याळपणा, कोकणी-गोवन संगीताचा साज आणि प्रेमात पडलेल्या एका गावठी भाईची भन्नाट कथा यांचा अनोखा मिलाफ असलेलं 'भाई खुळावलो' हे गाणं प्रेक्षकांच्या भेटीला आलं आहे. पुर्वा म्युझिक प्रस्तुत आणि सेव्हन सीज मोशन पिक्चर्स निर्मित या गाण्याची निर्मिती समीर परब यांनी केली असून, गाण्याचं संगीत आणि दिग्दर्शन प्रितीश प्रकाश कामत यांनी केलं आहे. गायक नागेश मुरवेकर यांच्या खट्याळ आणि मिश्कील आवाजामुळे गाण्याला अस्सल मालवणी रंग लाभला आहे. या गाण्यात अभिनेता नितीश चव्हाण आणि अभिनेत्री रुचिरा जाधव प्रमुख भूमिकेत आहेत.

गाण्याच्या संकल्पनेबद्दल संगीतकार-दिग्दर्शक प्रीतीश कामत सांगतात की, "सुरुवातीला या गाण्याचे बोल मराठीमध्ये तयार करण्यात आले होते. मात्र, संगीतबद्ध करताना गाण्याला आणखी वेगळा आणि हटके टच देण्याची गरज जाणवली. त्यातून एका मुलीच्या प्रेमात पडलेल्या गावातील भाईची व्यक्तिरेखा आणि त्याची गंमतीदार प्रेमकहाणी साकारण्याची कल्पना सुचली.'खुळावलो'हा मालवणी भाषेतील शब्दप्रयोग या व्यक्तिरेखेला आणि कथेला अगदी साजेसा वाटल्याने संपूर्ण गाणं मालवणी भाषेत पुन्हा साकारण्यात आलं. गाण्याच्या संगीतामध्ये मालवणी आणि कोकणी लोकसंगीतासोबत गोवन संगीताची झलक देण्यात आली असून, स्थानिक फोक आणि तारकर्लीच्या वातावरणाशी जुळणारी संगीताची वाईब तयार करण्यात आली आहे. विशेष म्हणजे या गाण्याच्या संगीत निर्मितीची सुरुवात अकापेला पद्धतीने करण्यात आली होती. केवळ वोकल्सच्या माध्यमातून संगीताचा बेस तयार करत पुढे त्यामध्ये विविध वाद्यांचा समावेश करण्यात आला."

अभिनेत्री रूचिरा जाधव या गाण्याच्या



चित्रीकरणा दरम्यानचा गंमतीदार किस्सा सांगते, "कोकणात शूट होतं म्हणून मी फार उत्सुक होते. पण शूटींग दरम्यान मला समुद्रात बुडण्याचा सीन होता असं कळलं. मला आधीच पाण्याची भीती वाटते. मी टीमला हे सांगताच सगळ्यांनीच चिंता व्यक्त केली. परंतु प्रोडक्शनने आवश्यक सुरक्षा व्यवस्था आणि लाइफसेव्हर्सची व्यवस्था केलेली. आणि मग अश्याप्रकारे मी तो सीन यशस्वीपणे पूर्ण केला. त्या सीनमधील माझे हावभाव हे खरे आहेत. सकाळी ८ वाजल्यापासून दुसऱ्या दिवशी सकाळी ७ वाजेपर्यंत सुरू असलेल्या या शूटमध्ये मी, सहकलाकार नितीश आणि तंत्रज्ञांनी खूप धमाल केली. त्यामुळे शूटिंगदरम्यानची धमाल आणि गाण्याची रंगत व्हिडिओमध्येही जिवंतपणे उमटली आहे."

नितीश चव्हाण यांच्या नृत्याला विशेष महत्त्व देण्यात आलं असून पुण्यकर उपाध्याय यांनी कोरिओग्राफी केली आहे. गाण्याचं चित्रीकरण मालवण आणि तारकर्ली परिसरात करण्यात आलं असून MTDC, तारकर्ली आणि सोलकढी रेस्टॉरंट या ठिकाणांचा विशेष वापर करण्यात आला आहे. चित्रीकरणादरम्यान आलेले मजेशीर अनुभवही या व्हिडिओमध्ये पाहायला मिळतात. या गाण्याचे गीतकार सचिन कोतुळकर, अरेंजर उदय साळवी, फिमेल व्होकल्स प्राजक्ता माने, कोरस गोविंद कांबळे, विपुल कदम, श्रीकांत शिरसाट आणि प्रितीश कामत असून रूपक ठाकूर यांनी मिक्सिंग आणि मास्टरिंग केलं आहे. व्हिडिओचं दिग्दर्शन आणि एडिटिंग प्रितीश प्रकाश कामत यांनी, छायांकन आणि कलरिंग शशि उपाध्याय यांनी, तर प्रॉडक्शन डिझाइन प्रवीण चिंदरकर आणि टीम यांनी केलं आहे.

थोडक्यात पण महत्वाचे



स्वच्छता ही सेवा उपक्रमांतर्गत जी.व्ही.पी. पॉईंट स्वच्छता व वेस्ट टू आर्ट संकल्पना

पिंपरी : दैनिक संध्या

डिवाइन कर्मचारी ,तिरूपती कर्मचारी ,कामगार व स्थानिक नागरिक "स्वच्छता ही सेवा" या उपक्रमांतर्गत मडेगिरी नाला जी.व्ही.पी. (Garbage Vulnerable Point) ठिकाणी विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. सदर उपक्रमामध्ये स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून जी.व्ही.पी. पॉईंट परिसराची सखोल साफसफाई करण्यात आली. परिसरात साचलेला कचरा, प्लास्टिक तसेच इतर अनावश्यक टाकाऊ वस्तू संकलित करून त्याची योग्य प्रकारे विल्हेवाट लावण्यात आली. सदर परिसर अधिक स्वच्छ, सुंदर व आकर्षक दिसावा तसेच नागरिकांमध्ये "कचरा हा समस्या नसून योग्य वापर केल्यास तो कलात्मक निर्मितीसाठी उपयुक्त ठरू शकतो" हा संदेश पोहोचावा, यासाठी "वेस्ट आर्ट" या संकल्पनेचा वापर करण्यात आला. विविध टाकाऊ वस्तूंचा पुनर्वापर करून आकर्षक व उपयुक्त सजावटीच्या वस्तू तयार करण्यात आल्या. या माध्यमातून कचऱ्याचा पुनर्वापर, पुनर्निर्मिती आणि पर्यावरण संवर्धन याबाबत जनजागृती करण्यात आली. त्यामुळे सदर जी.व्ही.पी. पॉईंटचे रूपांतर स्वच्छ व सुशोभित परिसरामध्ये करण्यात आले.महापौर रवी लांडगे, नगरसेविका अश्विनी वाबळे, नगरसेवक तुषार सहाणे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविला गेला. या उपक्रमादरम्यान परिसरातील नागरिकांना सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकू नये, परिसर स्वच्छ ठेवावा, कचरा रस्त्यावर किंवा मोकळ्या जागेत न टाकता घंटागाडी/कचरा संकलन व्यवस्थेकडे द्यावा तसेच ओला व सुका कचरा वेगवेगळा करून द्यावा, याबाबत माहिती देण्यात आली. तसेच टाकाऊ वस्तूंचा पुनर्वापर करून विविध कलात्मक वस्तू तयार करता येतात, याबाबतही नागरिकांना प्रोत्साहित करण्यात आले. या उपक्रमाचा मुख्य उद्देश जी.व्ही.पी. मुक्त परिसर निर्माण करणे, सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकण्याची प्रवृत्ती कमी करणे, कचरा वर्गीकरण व पुनर्वापराबाबत जनजागृती करणे आणि नागरिकांच्या सहभागातून स्वच्छ व सुंदर परिसर निर्माण करणे हा होता.सदर उपक्रमामुळे सद्गुरू नगर प्रवेश द्वार भोसरी येथील जी.व्ही.पी. पॉईंट स्वच्छ व सुशोभित करण्यात आला असून, नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत सकारात्मक संदेश पोहोचविण्यात आला. "स्वच्छ परिसर – सुंदर परिसर" या संकल्पनेतून नागरिकांनी स्वच्छता राखण्यासाठी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले, या उपक्रमात आरोग्य अधिकारी वाघमारे, मुख्य आरोग्य निरीक्षक दिपक कोटीयाना, आरोग्य निरीक्षक महेंद्र साबळे, सहाय्यक आरोग्य निरीक्षक नितीन मांढरे सहभाग घेतला

दिवेआगार दुर्घटनेतील मृत विद्यार्थ्यांना श्रद्धांजली; आळंदी आणि केळगाव बंद

पिंपरी : दैनिक संध्या

दिवेआगार येथे घडलेल्या दुर्दैवी दुर्घटनेत आळंदीतील आठ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याने संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. या दुर्घटनेतील मृत विद्यार्थ्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी तसेच शोकाकुल कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी होण्यासाठी आज (दि.२ ऑक्टोबर) आळंदी आणि केळगाव बंदचे आवाहन करण्यात आले आहे. आळंदी देवाचीचे नगराध्यक्ष प्रशांत पोपटराव कुऱ्हाडे तसेच समस्त आळंदी व केळगाव ग्रामस्थांच्या वतीने सर्व व्यापारी, व्यावसायिक, संस्था, संघटना आणि नागरिकांना या बंदमध्ये स्वयंस्फूर्तीने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. दुर्घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या विद्यार्थ्यांच्या स्मरणार्थ परिसरातील नागरिकांनी एकजूट दाखवत शोक व्यक्त करण्याचा निर्णय घेतला आहे. या पार्श्वभूमीवर अनेक व्यापारी आणि व्यावसायिकांनीही बंदला पाठिंबा दर्शविला आहे. दरम्यान, नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी रुग्णालये, औषध दुकाने, रुग्णवाहिका सेवा तसेच इतर अत्यावश्यक सेवांना बंदमधून वगळण्यात आले असल्याची माहिती आयोजकांच्या वतीने देण्यात आली आहे. दिवेआगार दुर्घटनेमुळे आळंदी आणि परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र हळहळ व्यक्त होत असून, मृत विद्यार्थ्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी विविध ठिकाणी प्रार्थना सभा आणि श्रद्धांजली कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

साडेतीन शक्तिपीठ दर्शन यात्रेसाठी विशेष बससेवा

पिंपरी : दैनिक संध्या

नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर वल्लभनगर एसटी आगार येथून साडेतीन शक्तीपीठांचे दर्शन घेण्यासाठी विशेष बस सेवेचे आयोजन करण्यात आले आहे. या बससेवेच्या माध्यमातून भविकांना एकाच प्रवासात राज्यातील प्रमुख शक्तिपीठांचे दर्शन घेता येणार आहे. या यात्रेत भविकांना महालक्ष्मी मंदिर, (कोल्हापूर), तुळजाभवानी मंदिर, (तुळजापूर) आणि माता रेणूका देवी (माहूरगड) या प्रमुख शक्तीपीठांचे दर्शन घेता येईल. १५ ऑक्टोबर रोजी सकाळी ७.०१ वाजता वल्लभनगर आगारातून बसचे प्रस्थान होणार आहे. त्याच दिवशी रात्री ९.२९ वाजता माहूरगड येथे बस पोहोचले. प्रवासाचा मार्ग स्वारगेट, सोलापूर, तुळजापूर, लातूर, नांदेड, अर्धापूर, वारंगा फाटा, हदगाव, उमरखेड, महागाव, माहूरगड असा बसचा मार्ग असेल. भविकांचा प्रवास सुखकर आणि सुरक्षित व्हावा यासाठी अनुभवी चालक वाहकांची नियुक्ती केली आहे. प्रवासादरम्यान भक्तांच्या सोयी सुविधांची विशेष काळजी घेतली जाणार आहे, अशी माहिती एसटी प्रशासनाने दिली आहे.

कचरा प्रक्रिया केंद्रांवरून मतभेद

पिंपरी : दैनिक संध्या

पिंपरी-चिंचवड शहरात दहा ठिकाणी कचरा प्रक्रिया केंद्रांच्या ठिकाणची घोषणा आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केली आहे. मात्र, आमच्या प्रभागात कचरा केंद्र नको, असा दबाव स्थानिक नगरसेवकांकडून करण्यात येत आहे. त्यामुळे घनकचरा समस्या सोडवण्यासाठी प्रयत्नांना खो बसत असून, विरोधामुळे प्रशासन हतबल झाले आहे. महापालिकेच्या मोशी कचरा डेपोतील वेस्ट टू एनर्जी प्रकल्पाती अनधिकृत प्रशासकीय इमारत कोसळल्यानंतर झालेल्या दुर्घटनेत 9 कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला. तर, काही कर्मचारी जखमी झाले आहेत. ती घटना 8 जुलैला घडली. त्यानंतर संपूर्ण शहरात कचरा कोंडीची समस्या निर्माण झाली. कचरा कोठे डम्प करायचा, हा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता. तात्पुरता पर्याय म्हणून सध्या मोशी डेपोतच कचरा डम्प केला जात आहे. शहरातील दहा क्षेत्रीय कार्यालयात एक असे एकूण दहा ठिकाणी कचरा प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. जागांचा शोध घेऊन महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी त्या जागांची यादी 13 सप्टेंबरला जाहीर केली. त्यानंतर नगरसेवकांसह त्या प्रभागातील विविध संघटना, माजी नगरसेवक, पदाधिकारी व नागरिकांकडून तेथे कचरा प्रक्रिया केंद्र सुरू करण्यास विरोध करण्यात येत आहेत. त्याबाबत आयुक्तांना आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांना भेटून दबाव टाकला जात आहे. कोणत्याही परिस्थितीत कचरा केंद्र आमच्या प्रभागात करू नका, असा आग्रह धरला जात आहे. या विरोधामुळे प्रशासन हतलब झाले आहे. नगरसेवकच विरोध करत असतील तर, कचरा प्रक्रिया केंद्र सुरू कोठे करायचे, शहराचा कचरा प्रश्न कसा सोडवायचा, असा प्रश्न प्रशासनासमोर उभा झाला आहे.



'स्वच्छता ही सेवा' अभियानांतर्गत नवी सांगवीत स्वच्छता मोहीम

१५८ किलो कचरा व प्लास्टिक संकलित

■ पिंपरी (दै. संध्या)

महात्मा गांधी जयंती आणि लालबहादूर शास्त्री जयंतीनिमित्त 'स्वच्छता ही सेवा' अभियानाअंतर्गत नवी सांगवी येथील बाबुरावजी घोलप माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय परिसरात स्वच्छता मोहीम उत्साहात राबविण्यात आली. पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, बेसिक्स टीम आणि बाबुरावजी घोलप विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने झाली. यानंतर पर्यावरण संवर्धनाची शपथ घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी स्वच्छता व पर्यावरण जनजागृतीसाठी पथनाट्य सादर केले तसेच वृक्षारोपण करून पर्यावरण संरक्षणाचा संदेश दिला. यावेळी मुख्य आरोग्य निरीक्षक उद्धव डवरी, आरोग्य निरीक्षक स्नेहल सोनवणे, बाबुरावजी घोलप विद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक, आरोग्य मुकादम अरुण जगताप, महापालिकेचे कर्मचारी, बेसिक्स टीमचे सदस्य तसेच शाळेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी प्लॉगाथॉनमध्ये सहभागी होत विद्यालय परिसर आणि परिसरातील सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता केली.

या स्वच्छता मोहिमेदरम्यान सुमारे १५८ किलो कचरा आणि प्लास्टिक संकलित करण्यात आले. या उपक्रमातून स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक जबाबदारीचा प्रभावी संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आला.

एकाच कार्यकर्त्याला दोन पदे; पिंपरी-चिंचवड भाजपमध्ये नाराजीचा सूर

■ पिंपरी (दै. संध्या)



भारतीय जनता पक्षाच्या पिंपरी-चिंचवड शहर संघटनेतील पदनियुक्तींवरून आता अंतर्गत नाराजीचा सूर उमटू लागला आहे. दि. २९ सप्टेंबर रोजी भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या पिंपरी-चिंचवड दौऱ्यादरम्यान आमदार महेश लांडगे समर्थक कार्यकर्ते संजय पटणी यांना शहर सरचिटणीसपदाचे नियुक्तीपत्र देण्यात आल्याचा दावा भाजप कार्यकर्ते सचिन काळभोर यांनी केला आहे. यामुळे जुन्या व निष्ठावंत कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम निर्माण झाल्याचे त्यांनी म्हटले आहे.

काळभोर यांच्या म्हणण्यानुसार, संजय पटणी यांची काही महिन्यांपूर्वीच पिंपरी-चिंचवड शहर भाजपच्या कार्यकारिणीत वरिष्ठ उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली होती. मार्च २०२६ मध्ये त्यांच्या वरिष्ठ उपाध्यक्षपदावरील नियुक्तीचे वृत्तही प्रसिद्ध झाले होते. त्या पार्श्वभूमीवर आता पुन्हा शहर सरचिटणीसपदाची जबाबदारी देण्यात आल्याने एकाच व्यक्तीकडे दोन संघटनात्मक जबाबदाऱ्या देण्याच्या निर्णयावर प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

'पक्षासाठी अनेक वर्षे काम करणारे, आंदोलने व मोर्चे काढून नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करणारे निष्ठावंत कार्यकर्ते असताना त्यांना डावलून एका कार्यकर्त्याला वारंवार पदे देण्यामागील निकष काय आहेत?' असा सवाल काळभोर यांनी उपस्थित केला आहे.

पक्ष संघटनेत काम करणाऱ्या जुन्या कार्यकर्त्यांना सातत्याने संधी मिळणे आवश्यक असून, स्थानिक पातळीवरील पदनियुक्त्या करताना शहरातील सर्व पदाधिकारी, आमदार, खासदार आणि कार्यकर्त्यांशी चर्चा करून निर्णय घेण्यात यावा, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

'पक्षाच्या शहर संघटनेत एका व्यक्तीलाच दोन पदांवर नियुक्ती करण्याची पद्धत भविष्यात इतर कार्यकर्त्यांमध्ये नाराजी निर्माण करू शकते. त्यामुळे पदनियुक्त्यांमध्ये सर्वांना समान संधी मिळावी,' अशी अपेक्षा काळभोर यांनी व्यक्त केली.

या प्रकरणाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने दखल घेऊन शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांच्या कार्यपद्धतीची चौकशी करावी तसेच प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी स्थानिक पातळीवरील पदनियुक्त्यांसाठी व्यापक चर्चा व सल्लामसलतीची प्रक्रिया राबवावी, अशी मागणी काळभोर यांनी केली आहे.

पिंपरी-चिंचवडकर नोंदवणार नवा विश्वविक्रम..!

■ पिंपरी (दै. संध्या)

महाराष्ट्रभरातील ढोल-ताशा पथकांच्या साथीने पिंपरी-चिंचवडकर नव्या विश्वविक्रमाचा संकल्प साकारण्यासाठी सज्ज झाले आहेत. हजारो ढोल-ताशांचा गगनभेदी निनाद, १११ शंखांचा सामूहिक शंखनाद, शिवभक्तीपर गीतांचा जागर आणि मर्दानी खेळांची चित्तथरारक प्रात्यक्षिके अशा सादरीकरणांनी मोशी येथे ऐतिहासिक मानवंदना सोहळा रंगणार आहे. यासाठी पाच हजारांहून अधिक ढोलवादकांची नोंदणी पूर्ण झाल्याची माहिती आयोजकांनी दिली.

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या 'स्टॅच्यू ऑफ हिंदूभूषण'ला आणि उभारण्यात येत असलेल्या १२८ मीटर उंच भगव्या 'धर्मध्वज'ला मानवंदना देण्यासाठी रविवार, दि. ४ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी २ वाजता या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. बो-हाडेवाडी, मोशी येथील धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्रात कार्यक्रम होणार असून, सर्व नागरिकांसाठी प्रवेश मोफत आहे. हिंदूभूषण स्मारक ट्रस्ट, पिंपरी-चिंचवड आणि ढोल-ताशा महासंघ, महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सोहळ्यात शौर्य, सांस्कृतिक परंपरा, राष्ट्रभक्ती आणि सामाजिक बांधिलकीचा संगम अनुभवायला मिळणार आहे. गतवर्षी 'स्टॅच्यू ऑफ हिंदूभूषण'ला ढोल-ताशांच्या विश्वविक्रमी निनादातून मानवंदना देण्यात आली होती. त्या सोहळ्याची प्रेरणा घेऊन यंदा अधिकाधिक पथकांना एकत्र आणण्याची तयारी सुरू आहे. महाराष्ट्राच्या रणवाद्य परंपरेचा वारसा जपणारी पथके राज्यभरातून पिंपरी-चिंचवडमध्ये दाखल होणार आहेत. विविध पथकांच्या सामूहिक वादनातून नवा विश्वविक्रम नोंदविण्याचा आयोजकांचा संकल्प असून, विक्रमाची अधिकृत पुष्टी कार्यक्रमानंतर होईल.पिंपरी-चिंचवडमध्ये उभारण्यात येत असलेला १२८ मीटर उंच धर्मध्वज जगातील सर्वांत उंच भगवा ध्वज ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

दुचाकी चोरून भंगारात स्पेअर पार्ट विकणारी टोळी गजाआड

■ पिंपरी (दै. संध्या)



दुचाकी चोरायच्या, त्यांचे सुटे भाग वेगळे करायचे आणि ते भंगारात विकून पैसे कमवायचे, असा उद्योग करणाऱ्या टोळीचा बावधन पोलिसांनी पर्दाफाश केला. या कारवाईत दोघांना अटक करण्यात आली असून एका अल्पवयीन साथीदाराला ताब्यात घेण्यात आले आहे. आरोपींकडून पाच दुचाकी आणि वाहनांचे सुटे भाग असा एकूण २ लाख ६५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.


पवन मरीआप्पा भज्जी (वय २५, रा. औंध, पुणे) आणि ऋषीकेश शहाजी साठे (वय २९, रा. पिंपळे निलख) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद पवार यांनी दिलेल्या माहितीनुसार, बाणेर येथील रोहन लेअर सोसायटीमधून यामाहा एमटी १५ दुचाकी चोरीला गेली होती. याप्रकरणी बावधन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर परिसरातील तब्बल ९० ते १०० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासले. त्यातून चोरटे पिंपळे निलख येथील इंगवले चौकाच्या दिशेने गेल्याचे स्पष्ट झाले.


पोलिसांनी मिळालेल्या माहितीच्या आधारे ऋषीकेश साठे याच्या पिंपळे निलख येथील फॅब्रिकेशनच्या दुकानाची झडती घेतली. तेथे चोरीच्या दुचाकींचे पार्टस वेगळे करून ते भंगारात विकण्याचे काम सुरू असल्याचे समोर आले.

पोलिसांनी कारवाई करत पाच दुचाकी आणि मोठ्या प्रमाणात सुटे भाग जप्त केले. आरोपींवर यापूर्वीही वाकड पोलीस ठाण्यात गंभीर गुन्हे दाखल असल्याचे पोलिसांनी सांगितले. पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, सहआयुक्त डॉ. शशीकांत महावरकर, अप्पर आयुक्त बसवराज तेली, सारंग आवाड, उपायुक्त प्रदीप जाधव, सहायक आयुक्त विठ्ठल कुबडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सारंग ठाकरे, स्वप्निल साबळे, अक्षय लाटे, फारुक मुल्ला आदींच्या पथकाने ही कारवाई केली.

संभाजीनगर येथे कोयत्याने कार फोडली, नागरिकांना जीवे मारण्याची धमकी

■ चिंचवड (दै. संध्या)





चिंचवडच्या संभाजीनगर परिसरात कारवर लोखंडी कोयत्याने हल्ला करून तोडफोड केल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेमुळे परिसरात काही काळ दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते. याप्रकरणी निगडी पोलिसांनी पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

३० सप्टेंबर रोजी सायंकाळी सव्वापाचच्या सुमारास वृंदावन सोसायटीसमोर, रामेश्वर मंदिराजवळ ऋषिकेश संजय वराडी (वय २८) यांची रस्त्यालगत पार्क केलेली फोक्सवॅगन व्हेंटो (MH 14 CS 1625) कार आरोपींनी लोखंडी कोयत्याने फोडली. या हल्ल्यात कारच्या काचा व बोनेटचे अंदाजे २५ हजार रुपयांचे नुकसान झाले.


कारची तोडफोड करताना आरोपींनी उपस्थित नागरिकांना जीवे मारण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद आहे. त्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

तक्रारदाराच्या फिर्यादीवरून नागेश चोपडे, अभिषेक यादव, अभिषेक गोसावी, सिद्धार्थ माने आणि एका साथीदाराविरुद्ध BNS, भारतीय हत्यार कायदा, महाराष्ट्र पोलीस अधिनियम तसेच क्रिमिनल अमेंडमेंट ॲक्टच्या विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घटनेची माहिती मिळताच सहाय्यक पोलीस आयुक्त प्रशांत ढोले आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश बनसोडे यांनी घटनास्थळाची पाहणी केली. आरोपींचा शोध सुरू असून पोलीस उपनिरीक्षक मुकेश गायकवाड पुढील तपास करीत आहेत.

अप्पूघरात सर्रास वृक्षतोड? प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह

■ पिंपरी (दै. संध्या)





निगडी प्राधिकरणातील अप्पूघर परिसरात मोठ्या प्रमाणात वृक्षतोड होत असल्याची घटना समोर आली आहे. या प्रकारामुळे पर्यावरणप्रेमी आणि स्थानिक नागरिकांमध्ये नाराजी निर्माण झाली असून, वृक्षतोडीस परवानगी नेमकी कोणी दिली? नियमांचे पालन झाले आहे का? असा सवाल उपस्थित होत आहे.

अप्पूघर परिसरात मोठ्या प्रमाणात झाडे कापली जात असल्याचे निदर्शनास आले आहे. शहरात एकीकडे पर्यावरण संवर्धन, वृक्षलागवड आणि हरित क्षेत्र वाढविण्याच्या घोषणा केल्या जात असताना दुसरीकडे हिरवीगार झाडे तोडली जात असतील तर महापालिका प्रशासन नेमके काय करत आहे? या प्रकरणाची तातडीने दखल घेण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक प्रमोद कुटे यांनी केली आहे.

वृक्षतोडीच्या ठिकाणी महापालिका प्रशासन आणि पर्यावरण व वृक्ष प्राधिकरण विभागाच्या अधिकाऱ्यांनी तातडीने पाहणी करावी. संबंधित झाडे तोडण्यासाठी अधिकृत परवानगी घेण्यात आली आहे का? परवानगीतील अटींचे पालन झाले आहे का? याची सखोल तपासणी करावी. परवानगी नसताना वृक्षतोड होत असल्याचे आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करावी आणि तत्काळ वृक्षतोड थांबवावी, अशी भूमिका कुटे यांनी घेतली आहे.

शहराच्या वाढत्या काँक्रिटीकरणामुळे आधीच पर्यावरणाचा समतोल बिघडत असताना शहरात नैसर्गिक साधन संपत्ती लाभलेल्या दुर्गा टेकडी परिसरातील अप्पू घर येथील असलेली झाडेही अशा प्रकारे तोडली जात असतील तर भविष्यात नागरिकांना त्याची मोठी पर्यावरणीय किंमत मोजावी लागू शकते.

थोडक्यात पण महत्वाचे



महिला तक्रार निवारण समितीवर शेवकरी

चाकण : दैनिक संध्या

जनता शिक्षण संस्थेच्या येथील श्री शिवाजी विद्या मंदीर व कनिष्ठ महाविद्यालयातील शाळा व्यवस्थापन समिती अंतर्गत महिला तक्रार निवारण समितीच्या स्थानिक स्वराज्य संस्थेसाठी महिला प्रतिनिधी म्हणून येथील नगरसेविका ॲड.वर्षाताई सुयोगदादा शेवकरी यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. प्रशालेचे प्राचार्य अनिल ठुबे, आदर्श शिक्षक राजेंद्र खरमाटे, राजेंद्र वाघमारे व मुरलीधर मांजरे आदींच्या हस्ते वर्षाताई शेवकरी यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी नगरसेवक मंगेश कांडगे, शशिकांत जाधव, स्मिता जाधव, साहेबराव कड, शामराव राक्षे, आरती परदेशी, विजया तोडकर, आकाश जाधव, रेश्मा मुटके, आरती परदेशी आदी उपस्थित होते. ॲड. वर्षाताई शेवकरी या येथील प्रसिद्ध वकील ॲड. सुयोग शेवकरी यांच्या पत्नी तर, सेवानिवृत्त शिक्षक अशोक शेवकरी यांच्या सुनबाई आहेत.

दीपमाळ गावाच्या वैभवाचे प्रतिक

मंचर : दैनिक संध्या

दीपमाळ ही वैभवाचे प्रतिक असून, ती गावाची.वाडीची आणि जागृत देवस्थानाच्या वास्तुकलेची आणि संपन्नतेची साक्ष देते. असे प्रतिपादन समाजप्रबोधनकार संतोष महाराज बढेकर यांनी केले. म्हाळसाकांत खंडोबा देवस्थान मंदिर धामणी(तालुका आंबेगाव)येथील "मार्तंड" महाद्वाराच्या समोर नवीन दगडी दीपमाळेच्या कामाच्या शुभारंभ प्रसंगी बढेकर बोलत होते. दीपमाळ ही प्रामुख्याने महाराष्ट्रातील मराठमोळ्या मंदिर वास्तुकलेचे एक ठळक वैशिष्ट्य आणि पारंपारिक शिल्प प्रकार आहे. मंदिराच्या प्रांगणात किंवा प्रवेशद्वारासमोर रात्रीच्या वेळी उजेड करण्यासाठी दीपमाळ उभारली जाते. मराठा काळात नवस फेडण्यासाठी किंवा देवाला केलेल्या संकल्पाची इच्छापूर्ती बद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी मंदीरासमोर दीपमाळ उभारण्याची प्रथा होती. धामणीकर ग्रामस्थांनी लोकसहभागातून तीन दगडी दीपमाळा उभारण्याचा संकल्प केलेला आहे तो निश्चितच कौतुकास्पद असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. खंडोबा मंदिरासमोरील पहिल्या दिपमाळेचे बांधकाम अंतिम टप्प्यात आहे.काल बुधवारी दुसऱ्या दगडी दीपमाळेच्या बांधकामाचा शुभारंभ संतोष बढेकर व वाशी मार्केटचे व्यापारी बाळासाहेब ज्ञानेश्वर बढेकर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी देवस्थान जीर्णोद्धार समितीचे अध्यक्ष प्रकाश पाटील जाधव. सेवेकरी दादाभाऊ भगत. सुभाष तांबे. प्रभाकर भगत.रामदास बोऱ्हाडे.प्रमोद देखणे.सुरेश बढेकर. मच्छिंद्र रोकडे.राजेंद्र सरडे उपस्थित होते.

हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने गौरव कोतवाल यांचे निधन अष्टापूरवर शोककळा

कोरेगावमुळ : दैनिक संध्या



आयुष्याची स्वप्ने पाहण्याचे, कुटुंबासाठी आणि व्यवसायासाठी उभे राहण्याचे हे वय. मात्र अवघ्या २९ व्या वर्षी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने हवेली तालुक्यातील अष्टापूर येथील युवा उद्योजक गौरव दिलीप कोतवाल यांचे आकस्मिक निधन झाले. त्यांच्या निधनाने अष्टापूर परिसरावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार आणि परिसरामध्ये हळहळ व्यक्त होत आहे. गौरव यांच्या पश्चात आई-वडील, बंधू, बहीण आणि पत्नी असा परिवार आहे. ज्या घरात आनंद, स्वप्ने आणि भविष्याच्या नियोजनाची चर्चा असायची, त्याच घरावर अचानक दुःखाची काळी छाया पसरली आहे. आई-वडिलांनी तरुण मुलाला गमावणे, पत्नीने जीवनसाथी गमावणे आणि भावंडांनी आपला आधार गमावणे, ही वेदना शब्दांत मावणारी नाही. कोतवाल परिवाराने दशक्रियाविधीच्या निमित्ताने हृदयविकार आणि आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीत आरोग्याची काळजी कशी घ्यावी, याबाबत जनजागृती व्हावी या उद्देशाने डॉ.सई जगताप व डॉ.भास्कर सर यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित केले होते. गौरव कोतवाल यांचे अकाली निधन ही केवळ एका कुटुंबाची हानी नसून, तरुण पिढीने आपल्या आरोग्याकडे गांभीर्याने पाहण्याची गरज अधोरेखित करणारी दुर्दैवी घटना आहे. त्यांच्या निधनाने कोतवाल परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला असून निर्माण झालेली पोकळी कधीही भरुन निघणारी नाही. या दुःखद प्रसंगी कोतवाल कुटुंबीयांना हे दुःख सहन करण्याची शक्ती मिळो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना. दशक्रियाविधीप्रसंगी पुणे महापालिकेचे नगरसेवक, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक, यशवंत सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन, व्हाईस चेअरमन व संचालक मंडळ, कृषी उत्पन्न बाजार समितीचे चेअरमन, व्हाईस चेअरमन व जिल्हा परिषद सदस्य, संचालक मंडळ, हवेली तालुका पंचायत समितीचे सदस्य, हवेली तालुक्यातील आजी-माजी पदाधिकारी, सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, सोसायटीचे चेअरमन, व्हाईस चेअरमन, संचालक, तंटामुक्तीचे अध्यक्ष, ग्रामस्थ, महिला, वारकरी संप्रदाय मधील मंडळी, कोतवाल परिवाराचे स्नेही, भावबंध, आप्तेष्ट, सगेसोयरे आणि मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.

सबनीस विद्यालयाचा संघ तालुक्यात प्रथम

नारायणगाव : दैनिक संध्या

नारायणगाव येथील ग्रामोन्नती मंडळाच्या गुरुवर्य रा. प. सबनीस विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाच्या १९ वर्षांखालील मुलांच्या खो-खो संघाने तालुकास्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले. या विजयामुळे संघाची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. नागदवाडी येथील व्ही.जे. नॅशनल स्कूलच्या मैदानावर या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रीडा व सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जुन्नर तालुका क्रीडा शिक्षक संघटना आणि व्ही. जे. इंटरनॅशनल स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा पार पडली. स्पर्धेदरम्यान सबनीस विद्यालयाच्या खेळाडूंनी उत्कृष्ट सांघिक खेळाचे प्रदर्शन करत प्रतिस्पर्धी संघांवर मात केली. खेळाडूंच्या जिद्द, चिकाटी आणि अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर संघाने विजेतेपद पटकावले. या विजयी संघात साहिल सोमोशी,सुदर्शन भोर, अथर्व काशीद,जितेश भोर,सचिन भालचिम,अथर्व मेहेर, साई शिंदे, साई थोरात,सोहम सोलाट, ऋतुपर्ण वाघमारे,श्रेयस शिंदे, यश कोल्हे, जय मुळे व मेहुल जाधव या खेळाडूंचा समावेश आहे. संघाच्या या यशाबद्दल ग्रामोन्नती मंडळाचे विश्वस्त प्रकाश पाटे, कार्याध्यक्ष अनिल मेहेर, अध्यक्ष सुजित खैरे, उपाध्यक्ष शशिकांत वाजगे, मोनिका मेहेर, मुख्याध्यापिका मानसी भालेराव, कार्यवाहक रवींद्र पारगावकर, उपप्राचार्य संजय वलटे, सुनील ढवळे, पर्यवेक्षक अनुपमा पाटे यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले. तसेच क्रीडा शिक्षक आणि मार्गदर्शकांचेही कौतुक केले. या विजयामुळे सबनीस विद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून, जिल्हास्तरीय स्पर्धेतही संघाने अशीच चमकदार कामगिरी करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

श्री विरोबा पतसंस्थेची ३३ वी वार्षिक सभा खेळीमेळीत संपन्न



■ नारायणगाव (दै. संध्या)

श्री विरोबा नागरी सहकारी पतसंस्थेची '३३'वी वार्षिक सर्वसाधारण सभा श्री मुक्ताबाई समाज मंदिर सभागृह नारायणगाव येथे सोमवार (दि.२८) रोजी सकाळी १०.३० वा. संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब उर्फ नामदेव दत्तात्रय पाटे यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली. सर्व सभासदांचे सभासद प्रशिक्षण घेण्यात आले. या सभेस उत्स्फुर्त प्रतिसाद देत सभासदांनी उपस्थिती नोंदवित सर्व विषयांना मंजुरी दिली उपस्थित सभासदांमध्ये विजय तोडकर, परशुराम कोते, यांनी सुचना करत मार्गदर्शन केले.

अहवाल सालात संस्थेस ढोबळ नफा रू.२ कोटी ५६ लाख रू. इतका झाला असुन महत्वाच्या तरतुदी करून शिल्लक निव्वळ नफा रू.१ कोटी ०३ लाख रू. इतका आहे. संस्थेच्या ठेवी रू. ८३ कोटी ४६ लाख रू, खेळते भांडवल १०४ कोटी १९ लाख रू, इतके असुन सभासदांना १२% लाभांश जाहिर केला असुन दिपावली निमित्त किराणा वाटप देखील करणार आहेत.

अध्यक्ष बाळासाहेब उर्फ नामदेव द. पाटे यांनी मागदर्शन करत स्व. आशाताई बुचके यांना श्रद्धांजली अर्पन करत आपली संस्था अनेक सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक क्षेत्रात सहभाग घेऊन अनेक ठिकाणी भरघोस अशी मदत करत आलेली आहे. तसेच संस्था दरवर्षी स्वखर्चाने सभासदांचा रू.१० लाखाचा अपघाती विमा उतरवित असते आज पर्यंत अनेक सभासद किंवा त्यांचे वारसांना याचा लाभ देखील मिळालेला आहे. तसेच तरूणांना व विदयार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे म्हणुन संस्था नेहमी विविध क्षेत्रांमध्ये यश मिळविलेल्या विदयार्थ्यांचा सत्कार गुणगौरव करत असते.

सभेचे प्रास्ताविक, प्रगतीचा आढावा तसेच संस्थेचे सभेपुढील विषय वाचन संस्थेचे मुख्यकार्यकारी अधिकारी सुमित पाटे यांनी केले अध्यक्षिय मनोगत बाळासाहेब उर्फ नामदेव द. पाटे यांनी केले तसेच संचालक मनोगत योगेश (बाबु) पाटे, यांनी केले.

उपस्थित मान्यवरांमध्ये जुन्नर तालुक्याचे आमदार शरददादा सोनवणे, चेतनानंद महाराज पुणेकर, संतोष चव्हाण, संतोषनाना खैरे, माऊलीशेठ खंडागळे, रघुनाथ लेंडे, हर्षल गावडे यांनी मनोगत व्यक्त करत संस्थेची सहकार, सामाजिक व धार्मिक क्षेत्रात उल्लेखनिय कामगीरी तसेच संस्थेचे कामकाज अतिशय योग्य व उत्तम रित्या चालु असल्याचे सांगितले व व्यवसाय वाढीकरीता सोनेतारण कर्ज तसेच ई-मोटर्स कंपन्यांशी संपर्क करून वाहणतारण कर्ज उपलब्ध होईल याबाबत काम करावे. संस्थेचा एकुण वाढता व्यवसाय पाहता लवकरच संस्था १०० कोटी ठेवींचा टप्पा पार करेल असा विश्वास व्यक्त केला व याबद्दल मार्गदर्शन केले. तसेच आभार संस्थेचे सचिव राजेंद्र पाटे यांनी केले.

गांधीजी व शास्त्रीजी यांचे जीवन प्रेरणा देत राहील : गोरे




■ चाकण(दै. संध्या)

महात्मा गांधीजींनी सर्वांना धैर्य, साधेपणा, सेवा आणि करुणेच्या सामर्थ्याचा मार्ग दाखवला, तर लाल बहादूर शास्त्री यांचे जीवन आणि नेतृत्व एका सक्षम आणि आत्मनिर्भर राष्ट्राच्या निर्मितीसाठी सदैव प्रेरणा देत राहील, असे विचार प्राचार्या प्रमिला गोरे यांनी व्यक्त केले. स्व. गुलाबराव गोरे शिक्षण संस्थेत महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त गांधी व शास्त्री यांना अभिवादन करण्यात आले. प्रारंभी संस्थेचे अध्यक्ष विकास गोरे व प्राचार्या प्रमिला गोरे यांच्या हस्ते गांधी व शास्त्रीजी यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. स्व. गुलाबराव गोरे शिक्षण संस्थेच्या ज्ञानवर्धिनी विद्यालय, भामा इंग्लिश मीडियम स्कूल तसेच स्व. आमदार सुरेशभाऊ गोरे माध्यमिक विद्यालय व ज्युनियर कॉलेज, चाकण येथे हा उपक्रम राबविण्यात आला. राष्ट्रपिता महात्मा गांधी व लाल बहादूरजी शास्त्री यांच्या जयंतीचे औचित्य साधून ज्ञानवर्धिनी विद्यालय परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. प्राचार्या प्रमिला गोरे पुढे म्हणाल्या," महात्मा गांधी यांचे सत्य, अहिंसा व स्वच्छतेचे विचार तसेच लालबहादूर शास्त्री यांची साधी जीवनशैली, देशभक्ती व कर्तव्यनिष्ठा आजही समाजासाठी प्रेरणादायी मार्गदर्शक आहे. त्यांचा आदर्श आजच्या युवा पिढीला चालना व प्रेरणा देणारा एक चालता बोलता इतिहास आहे. समाज घडविणाऱ्या या देशभक्तांचे विचार प्रत्येकाने आपल्या रोजच्या दैनंदिन जीवनात आचरणात आणण्याची गरज आहे." यावेळी प्राचार्य सचिन आभाळे, प्रिन्सिपल माधुरी गोरे, पर्यवेक्षक सविता कुमकर, विभाग प्रमुख गणेश काळे, लीना चौधरी, दत्तात्रय लिंभोरे, सुनील वडेकर आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विहिरीत पडलेल्या पाळीव कुत्र्याला ग्रामस्थांनी दिले जीवदान

■ कवठे यमाई (दै. संध्या)



कवठे येथील ढाकी वस्ती परिसरात रात्रीच्या सुमारास एका पाळीव कुत्र्याचा विहिरीत पडून अपघात झाला. बहुदा बिबट्याने पाठलाग केल्याने जीव वाचवायच्या प्रयत्नात हा पाळीव कुत्रा विहिरीत पडला असण्याची शक्यता उपस्थितांनी व्यक्त केली आहे. विहिरीत पाणी होते व बाजूलाच खडकाची कपार असल्याने कुत्रा रात्रभर त्याव उभाच होता. दत्तात्रय सांडभोर हे सकाळी मोटार सुरू करण्यासाठी विहिरीजवळ गेल्यानंतर कुत्रा विहिरीत पडल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

कुत्र्याला बाहेर काढण्यासाठी दत्तात्रय सांडभोर, नितीन बाळासाहेब मुखेकर, पोपट सांडभोर आणि मनीषाताई सांडभोर यांनी तत्काळ धाव घेत मोलाचे सहकार्य केले. मोठ्या प्रयत्नांनंतर कुत्र्याच्या पोटाला रस्सी बांधून त्याला काळजीपूर्वक विहिरीबाहेर काढण्यात आले. सुदैवाने या घटनेत कुत्र्याला कोणतीही गंभीर दुखापत झाली नाही.

दरम्यान, नितीन शरद मुखेकर हे देखील आपल्या दोन-तीन सहकाऱ्यांसह मदतीसाठी घटनास्थळी येत होते. मात्र, ते पोहोचेपर्यंत कुत्र्याला सुखरूप बाहेर काढण्यात आले होते. त्यांच्या तसेच त्यांच्या सहकाऱ्यांच्या तत्परतेबद्दलही ग्रामस्थांनी आभार व्यक्त केले.मानवते सोबतच मुक्या जीवांप्रतीही संवेदनशीलता जपणाऱ्या या ग्रामस्थांच्या तत्परतेचे परिसरातून कौतुक होत आहे.

महाविद्यालय परिसरात टवाळखोरांचा उपद्रव

■ चाकण (दै. संध्या)

चाकणला महाविद्यालय परिसरात शाळा, कॉलेज सुटण्याच्या वेळेत हुल्लडबाजी करणाऱ्या टवाळखोरांचा प्रचंड उपद्रव वाढला आहे. शालेय विद्यार्थिनींच्या सुरक्षेचा प्रश्न त्यामुळे ऐरणीवर आला आहे. या पार्श्वभूमीवर शाळा व महाविद्यालय सुटण्याच्या वेळेत परिसरात कायमस्वरूपी पोलीस कर्मचाऱ्याची नियुक्ती करण्यात यावी, अशी जोरदार मागणी पालक आणि नागरिकांमधून केली जात आहे.

चाकण शहरात श्री शिवाजी विद्यामंदिर, कनिष्ठ महाविद्यालय, वरिष्ठ महाविद्यालय आहे. विद्यालय दुपारी बारा वाजता पहिल्या पाळीतील आणि सायंकाळी पाच वाजता दुसऱ्या पाळीतील सुटते. शाळा सुटण्याच्या या दोन्ही वेळेत शाळा परिसरात विद्यार्थ्यांची प्रचंड गर्दी असते. याचाच फायदा घेत काही बिनधास्त टवाळखोर तरुण या परिसरात विनाकारण फेऱ्या मारताना दिसतात. शाळा परिसरात दुचाकी गाड्यांचे सायलेन्सर काढून मोठा आवाज करत भरधाव वेगाने गाड्या चालवणे, दुचाकीवरून भरधाव वाहने दामटणे आणि शाळा सुटल्यावर विद्यार्थिनींचा पाठलाग करून त्यांना त्रास देणे अशा प्रकारांमध्ये मोठी वाढ झाली आहे. विशेष म्हणजे अशा टवाळखोरांपैकी बहुतेकांकडे वाहन चालवण्याचा परवाना, लायसेन्स देखील नसल्याचे धक्कादायक प्रकार समोर आले आहेत. चाकणला महाविद्यालय परिसरात या प्रकारामुळे विद्यार्थिनींमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून, पालकांमध्येही तीव्र चिंता व्यक्त केली जात आहे.शाळा व महाविद्यालय सुटण्याच्या कालावधीत येथील पोलीस प्रशासनाने शालेय परिसरात किमान एका पोलीसाची किंवा बीट मार्शलची नियुक्ती करण्याची गरज आहे. सर्वांच्या सुरक्षिततेसाठी शालेय परिसरात पोलीस प्रशासनाने कायमस्वरूपी पोलीस व एका बीट मार्शल ची नियुक्ती करणे गरजेचे आहे. संभाव्य धोके टाळण्यासाठी सुरक्षा पुरविण्याची गरज आहे. दुचाकीवर घिरट्या मारणाऱ्या टवाळखोरांवर कडक कारवाई करणे अपेक्षित आहे, असे मंगेशभाऊ कांडगे, नगरसेवक, चाकण यांनी सांगितले.

मुक्तादेवी पतसंस्थेकडून १३ टक्के लाभांशासह दिवाळी भेटवस्तू वाटप

■ नारायणगाव (दै. संध्या)



मुक्तादेवी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेला आर्थिक वर्षात तब्बल ९ कोटी ६५ लाख रुपयांचा निव्वळ नफा झाला असून, संस्थेच्या वतीने सभासदांना १३ टक्के लाभांश आणि दिवाळी भेटवस्तू देण्याचा निर्णय संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत घेण्यात आला.

संस्थेचे अध्यक्ष किसन मल्हारी वायकर यांच्या अध्यक्षतेखाली मुक्तादेवी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा अत्यंत उत्साहात पार पडली. या सभेत बोलताना अध्यक्षांनी पतसंस्थेच्या उल्लेखनीय आर्थिक प्रगतीचा आलेख मांडला.

अहवालानुसार संस्थेची आर्थिक स्थिती भक्कम असून सभासद संख्या ४३४२ आहे. संस्थेकडे एकूण १०१ कोटी ३८ लाख रुपयांच्या ठेवी जमा असून, संस्थेने ८४ कोटी ६६ लाख रुपयांचे कर्ज वाटप केले आहे. याशिवाय, संस्थेची गुंतवणूक ३० कोटी ८६ लाख रुपये असून, खेळते भांडवल १२३ कोटी ५८ लाख रुपयांवर पोहोचले आहे. विशेष बाब म्हणजे, स्थापनेपासून या पतसंस्थेला सातत्याने 'अ' ऑडिट वर्ग मिळत आला आहे, जे संस्थेच्या पारदर्शक व अचूक कारभाराचे प्रतीक आहे. सभेत उपस्थित असलेल्या सभासदांनी आणि संचालक मंडळाने संस्थेच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले.पतसंस्थेच्या विविध शाखांना अधिक सक्षम करण्यासाठी आणि ग्राहकांना उत्तम सेवा देण्यासाठी स्वतःच्या मालकीची भव्य इमारत उभारण्याच्या दृष्टीने पावले उचलली जात असून,संस्थेने यासाठी १०० कोटी रुपयांचा ठेवींचा टप्पा पार केला आहे, या महत्त्वपूर्ण वार्षिक सभेला उपाध्यक्ष योगेश शिंदे, संचालक गौरव वायकर, सावळेराम सोलाट, रवींद्र तोडकर, सचिन जुदरे, विशाल शिंदे, अक्षय शिंदे, चंद्रकांत भोर, संचालिका मनीषा डोंगरे, अंकुश चव्हाण, आरती सोलाट, प्रकाश दरेकर, राजू जाधव, पंढरीनाथ मोरे यांच्यासह अनेक मान्यवर, पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी संचालक सावळेराम सोलाट यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

चाकणला नगरसेवक व नगरसेविकेंनी केली मंदिर परिसराची स्वच्छता

■ चाकण (दै. संध्या)

गांधी जयंतीचे औचित्य साधून चाकण नगरपरिषदेच्या वतीने येथील प्रसिद्ध धार्मिक स्थळ श्री चक्रेश्वर मंदिर परिसरात विशेष स्वच्छता मोहीम उत्साहात राबवण्यात आली.


'स्वच्छ शहर, सुंदर शहर' या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या स्वच्छता अभियानात नगराध्यक्षा मनिषा गोरे, उपनगराध्यक्षा जयश्री नायकवाडी, गटनेते नितीन गोरे, नगरसेविका ॲड. वर्षा शेवकरी, मंगेश कांडगे, तृप्ती जगनाडे, रूपाली कांडगे, विजया जाधव, रेश्मा मुटके, सुवर्णा राक्षे आदींनी भाग घेतला होता. नगरपरिषदेचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष हातात झाडू घेऊन सक्रिय सहभाग नोंदवला.

चक्रेश्वर मंदिर परिसरात एकत्र येत सर्व लोकप्रतिनिधी व कर्मचाऱ्यांनी मंदिर परिसर, प्रदक्षिणा मार्ग, प्रवेशद्वार आणि आसपासच्या रस्त्यांची झाडलोट केली. या मोहिमेदरम्यान साचलेला कचरा, पालापाचोळा आणि प्लास्टिक पिशव्या गोळा करून त्यांची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावण्यात आली. मुख्याधिकारी डॉ. अंकुश जाधव यावेळी म्हणाले की," धार्मिक आणि सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखणे ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. मंदिर परिसरात येणाऱ्या भाविकांनी आणि स्थानिक नागरिकांनी कचरा कुंडीतच टाकण्याची गरज आहे. तसेच प्लास्टिकचा वापर टाळून परिसर स्वच्छ ठेवण्यास सहकार्य करणे अपेक्षित आहे. दरम्यान, चाकण नगरपरिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी आणि कर्मचाऱ्यांनी स्वतः हातात झाडू घेऊन केलेल्या या कामाचे चक्रेश्वर मंदिरातील भाविक आणि स्थानिक नागरिकांकडून विशेष कौतुक होत आहे.





दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



नैसर्गिक संकटात शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे

विधान परिषद उपसभापती सचिन अहिर : बांधावर जाऊन चर्चा, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या कुटुंबीयांचे केले सांत्वन

■ अमरावती (दै. संध्या)

नांदगाव खंडेश्वर परिसरातील गावांमध्ये अतिवृष्टी आणि दुष्काळ अशा दुहेरी संकटात शेतकरी सापडले आहेत. शेतकऱ्यांनी हताश होऊ नये. अशा संकट प्रसंगी शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे आहे. अमरावती जिल्ह्यातील सर्वच तालुके दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर केले आहेत, तातडीने पंचनामे करण्यात येऊन शेतकऱ्यांना मदत देण्यात येईल, अशी माहिती विधान परिषद उपसभापती सचिन अहिर यांनी आज येथे दिली.

नांदगाव खंडेश्वर परिसरातील गावांमध्ये अतिवृष्टी व दुष्काळामुळे झालेल्या नुकसानीची पाहणी उपसभापती श्री. अहिर यांनी केली. तसेच, सालोड येथील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना त्यांनी सांत्वनपर भेट दिली. त्यानंतर त्यांनी ही माहिती दिली.मौजा मुंड निशंकराव येथील दीपक बोलाईत आणि मंगरूळ चव्हाळा येथील जानबाजी पारसकर यांच्या शेतात जाऊन उपसभापती श्री. अहिर यांनी सोयाबीन पिकाची पाहणी केली. अतिवृष्टीमुळे शेतातील माती व पीक वाहून गेले. जमीन खरवडली. सोयाबीनला पुरेशा शेंगा धरल्या नाहीत. उत्पादन खर्चही निघेल अशी स्थिती नाही. अशा समस्या शेतकऱ्यांनी मांडल्या. या भागात अतिवृष्टीमुळे शेतीच्या नुकसानी सोबतच राहत्या घरांची पडझड झाली यासंदर्भात उपसभापती श्री अहिर यांनी माहिती जाणून घेतली. प्रशासनाकडून करण्यात येणाऱ्या उपाययोजनांची माहिती त्यांनी जाणून घेतली. शेतकरी व नागरिकांना वेळेत मदत देण्यासाठी कार्यवाही करण्याच्या सूचना त्यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना दिल्या. यानंतर सालोड येथील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना त्यांनी सांत्वनपर भेट दिली. मुरलीधर वेळूकर यांनी बॅकवॉटर पाण्यामुळे शेतीचे सततचे नुकसान होत असल्याने यावर्षी जुलै महिन्यात आत्महत्या केल्याची माहिती त्यांचे वडील बंधू प्रकाश वेळूकर यांनी दिली. या समस्येमुळे सालोड व परिसरातील शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्याची बाब त्यांनी मांडली. हा संपूर्ण विषय समजून घेत श्री. अहिर यांनी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांना हा विषय सोडविण्यासाठी पाटबंधारे विभागाचे अधिकारी आणि समस्याग्रस्त शेतकऱ्यांची बैठक घेण्याच्या सूचना केल्या. या विषयासंदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी डिसेंबर महिन्यामध्ये नागपूर येथे हिवाळी अधिवेशन कालावधीत संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेण्यात येईल असेही त्यांनी सांगितले. मुरलीधर वेळूकर यांच्या पत्नी वेळूकर,मुलगी समीक्षा आणि मुलगा सार्थक यांची आस्थेने चौकशी करून श्री. अहिर



यांनी त्यांचे सांत्वन केले व प्रशासन त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे त्यांना आश्वस्त केले. येथील मनोज फरकाडे या शेतकऱ्याने यावर्षी एप्रिल महिन्यात आत्महत्या केली, त्यांच्या कुटुंबीयांना उपसभापती श्री अहिर यांनी भेट दिली. पत्नी शुभांगी फरकाडे व रुद्रांश (४ वर्ष) आणि शिवराज (८ वर्ष) या मुलांना त्यांनी दिलासा दिला. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना दिली जाणारी मदत या कुटुंबाला मिळाली आहे. यासोबतच लाडकी बहीण योजना, श्रावण बाळ योजना आदी योजनांचा लाभ या कुटुंबाला देण्यात यावा, अशा सूचना त्यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना केल्या.

सालोड गावचे सरपंच जगदीश ढगे, उपविभागीय अधिकारी तेजश्री कोरे, गटविकास अधिकारी स्नेहल शेलार, तालुका कृषी अधिकारी विकास पाटील आणि गावकरी यावेळी उपस्थित होते. नुकसानीची पाहणी व आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना भेट दिल्यानंतर श्री. अहिर यांनी नांदगाव खंडेश्वर येथील श्री. क्षेत्र खंडेश्वर संस्थान येथे शेतकऱ्यांशी संवाद साधला व त्यांच्या समस्या समजून घेतल्या.

थोडक्यात पण महत्वाचे

सायबर गुन्ह्यांपासून संरक्षणासाठी जनजागृती हीच 'फायरवॉल'

मुंबई : शहरे, लहान गावे आणि ग्रामीण भागातील नागरिकांचा ऑनलाइन वावर वाढत असताना त्यांना सायबर गुन्ह्यांच्या नवनवीन प्रकारांचा धोका निर्माण होत आहे. त्यामुळे डिजिटल जनजागृती आणि डिजिटल स्वच्छता पूर्वीपेक्षा अधिक महत्त्वाची असून, भविष्यातील सायबर गुन्ह्यांपासून नागरिकांचे संरक्षण करण्यासाठी जनजागृती हीच प्रभावी 'फायरवॉल' ठरू शकते, असे माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी सांगितले. डेटा सिक्युरिटी कौन्सिल ऑफ इंडियाच्या (डीएससीआय) सायबर सुरक्षा जनजागृती महिना २०२६ अंतर्गत देशव्यापी 'बी सायबर स्ट्रीट स्मार्ट' मोहिमेचा शुभारंभ मंत्री ॲड. शेलार यांच्या हस्ते मुंबईतील बॉम्बे स्टॉक एक्स्चेंजमध्ये (बीएसई) झाला. महिनाभर चालणाऱ्या या मोहिमेत नागरिकांना दैनंदिन सायबर सुरक्षेच्या सवयींबाबत मार्गदर्शन करण्यासह कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने होणारी फसवणूक आणि वाढत्या सायबर गुन्ह्यांविषयी जागरूक करण्यात येणार आहे. मंत्री ॲड. शेलार म्हणाले की, निवृत्तीवेतनधारक, गुंतवणूकदार, ऑनलाइन शिक्षण घेणारे विद्यार्थी, डिजिटल उपकरणे वापरणाऱ्या माता तसेच ई-स्पोर्ट्स खेळाडू अशा प्रत्येक घटकाने ऑनलाइन सुरक्षिततेसाठी आवश्यक खबरदारी समजून घेणे गरजेचे आहे. प्रत्येक नागरिकापर्यंत सोपे आणि व्यवहार्य सुरक्षाविषयक संदेश पोहोचविणारी ही बहुघटक मोहीम कुटुंबे, व्यवसाय आणि समुदायांच्या सायबर सुरक्षेला बळकटी देईल. 'कठपुतळी' ही संकल्पना सायबर संरक्षणाचे महत्त्व प्रभावीपणे मांडते. ही मोहीम देशातील सर्वांत व्यापक सायबर जनजागृती मोहिमांपैकी एक ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.सायबर क्षेत्रातील सामूहिक प्रतिकारक्षमता वाढविण्यासाठी राज्य शासन उद्योग क्षेत्रासोबत काम करण्यास कटिबद्ध आहे. सायबर सुरक्षा ही केवळ तांत्रिक बाब नसून नागरिकांचा सजग सहभागही तितकाच आवश्यक आहे, असे मंत्री ॲड. शेलार यांनी स्पष्ट केले.

मुंबई जिल्हाधिकारी कार्यालयात 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत स्वच्छता

मुंबई : राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीचे औचित्य साधून तसेच 'सेवा संकल्प अभियाना'च्या अनुषंगाने मुंबई शहर जिल्हाधिकारी कार्यालयात आज विशेष स्वच्छता अभियान उत्साहात राबविण्यात आले. जिल्हाधिकारी आंचल गोयल यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या अभियानात अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत कार्यालय परिसराची स्वच्छता केली. अभियानाच्या प्रारंभी महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर जिल्हाधिकारी आंचल गोयल, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. शिवनंदा लंगडापुरे, अधीक्षक नगर भूमापन व भूमी अभिलेख शिवदास गुंड, सर्व उपजिल्हाधिकारी, तहसीलदार, नायब तहसीलदार तसेच कार्यालयातील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी स्वच्छता अभियानात सहभाग घेतला. यावेळी कार्यालय परिसरातील विविध ठिकाणी सखोल स्वच्छता करण्यात आली. त्यासोबतच प्रत्येक प्रशासकीय शाखा व विभाग कक्षामध्ये फायलींची शिस्तबद्ध मांडणी, नस्तीकरण व कक्ष स्वच्छतेची विशेष मोहीम राबविण्यात आली. कार्यालयातील कागदपत्रे आणि नोंदी व्यवस्थित ठेवून कार्यकक्ष अधिक सुटसुटीत करण्यावर भर देण्यात आला. 'स्वच्छता ही केवळ एका दिवसाची मोहीम नसून ती दैनंदिन कार्यसंस्कृतीचा अविभाज्य भाग असली पाहिजे,' हा संदेश या अभियानातून देण्यात आला. स्वच्छ, नीटनेटके आणि शिस्तबद्ध कार्यालयीन वातावरणामुळे प्रशासकीय कामकाज अधिक गतिमान होऊन नागरिकांना जलद, पारदर्शक आणि गुणवत्तापूर्ण सेवा देणे सुलभ होते, यावर यावेळी भर देण्यात आला. 'सेवा संकल्प अभियाना'च्या माध्यमातून स्वच्छतेसोबतच शिस्तबद्ध कार्यपद्धती आणि नागरिकाभिमुख प्रशासनाचा संदेश देत मुंबई शहर जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी स्वच्छ व कार्यक्षम कार्यालयाचा संकल्प केला.

प्लास्टिक पुनर्रचनेसाठी नागरिकांचा सहभाग आवश्यक

मंत्री पंकजा मुंडे : ठाण्यातून 'महा आर-पेट बॉटल व स्टिकर्स' अभियानाचा राज्यस्तरीय शुभारंभ



■ ठाणे (दै. संध्या)

पर्यावरणाचा समतोल राखणे आणि प्लास्टिकचा वाढता प्रभाव रोखणे, ही काळाची गरज बनली असून 'ग्लोबल वॉर्मिंग' थांबवण्यासाठी सर्वांच्या एकत्र येण्याची आवश्यकता आहे. प्लास्टिक अमर असले तरी त्याचे दुष्परिणाम अत्यंत गंभीर आहेत. या पार्श्वभूमीवर, शासनाचा एकही रुपया खर्च न करता स्वयंसेवी संस्थांच्या (एनजीओ) मदतीने प्लास्टिक पुनर्प्रक्रियेचे महत्त्वपूर्ण कार्य सुरू करण्यात येत आहे. महाराष्ट्रातील १३ ठिकाणी राबविण्यात येणाऱ्या 'महा आर-पेट' या अभियानाची सुरुवात ठाण्यातून होत असून, असा उपक्रम राबवणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरेल, असे प्रतिपादन राज्याच्या पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे यांनी केले.

ठाण्यातील हॉटेल विवांतच्या सभागृहात हिंदुस्तान कोका-कोला बेव्हरेजेस कंपनी, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि ठाणे महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'महा आर-पेट बॉटल व स्टिकर्स अनावरण आणि उद्घाटन' प्रसंगी त्या बोलत होत्या.यावेळी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाचे सदस्य सचिव राहुल रेखावार, कोका कोलाचे क्लस्टर हेड के.के. जोसेफ, चीफ पब्लिक अफेअर्स हिमांशू प्रियदर्शी तसेच प्रसिद्ध सिने कलाकार प्रसाद ओक, डिनो जोसेफ, शिवानी सुर्वे, अमित रेयॉन यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पर्यावरणमंत्री मुंडे यांनी उपस्थितांना संबोधित करताना सांगितले की, "पर्यावरण विभागातर्फे फोटो, व्हिडिओ आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून जनजागृती केली जात आहे. परंतु कर्तव्य आणि हक्क या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. फक्त आरसा पुसून चालणार नाही, तर डाग पुसला पाहिजे. 'एक बॉटल पर्यावरण के नाम' असे म्हणत प्रत्येकाने या अभियानात सक्रिय सहभाग नोंदवला पाहिजे."कार्यक्रमास उपस्थित विधानसभा सदस्य आमदार माधवी नाईक यांनी या उपक्रमाचे स्वागत करत सांगितले की, हा राज्यातील पहिलाच प्रोजेक्ट ठाण्यातून सुरू होत आहे. लोकप्रतिनिधी आणि सामान्य नागरिक म्हणून या अभियानाला पूर्ण सहकार्य केले जाईल. प्लास्टिकचा वापर कमी करून पर्यावरणाला योग्य दिशा देण्यासाठी समाजाने पुढे आले पाहिजे. आमदार निरंजन डावखरे यांनी सांगितले की, पर्यावरण विभाग व राज्य शासनामार्फत सुरू होणारे हे महा आर-पेट अभियान राज्यभर पसरणार आहे. प्रदूषण कमी करण्यासाठी विविध कंपन्यांनी आपल्या शाखांचा विस्तार करत पुढाकार घेतला पाहिजे. अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील यांनी ठाणे जिल्ह्याची निवड केल्याबद्दल समाधान व्यक्त केले. या अभियानाची मोठी जबाबदारी जिल्ह्यावर असून, जास्तीत जास्त सहभाग नोंदवण्यासाठी आणि उपक्रम यशस्वी करण्यासाठी प्रशासनाकडून सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाचे सदस्य सचिव राहुल रेखावार यांनी उपक्रमाची पार्श्वभूमी सांगताना स्पष्ट केले की, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाकडून पर्यावरणाचा ताण कमी करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. फेब्रुवारी २०२६ मध्ये मुंबईत या उपक्रमाचे पहिले पाऊल पडले होते. सखोल नियोजनाद्वारे ही प्रक्रिया तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचवून प्लास्टिकचा वापर कमी केला जाईल. 'लाईफ' (LiFE) या संकल्पनेचे पालन करून २०४७ पर्यंत कार्बन न्यूट्रॅलिटीचे (Carbon Neutral) ध्येय साध्य करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे त्यांनी नमूद केले.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली दुष्काळी स्थितीची पाहणी



■ छत्रपती संभाजीनगर (दै. संध्या)

दुष्काळी स्थितीच्या पार्श्वभूमीवर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज शेकटा मंडळात पिकांच्या अवस्थेची पाहणी केली. त्यांचे समवेत आमदार अनुराधा चव्हाण, आमदार नारायण कुचे, उपविभागीय अधिकारी डॉ. व्यंकटेश राठोड, तहसीलदार शिवानंद बिडवे तसेच शेतकरी व ग्रामस्थ उपस्थित होते.

शेकटा मंडळातील गाढे जळगाव येथील गट नंबर ३७६ येथील मजूर उस्मान खान पठाण या शेतकऱ्याच्या शेतात श्री. बावनकुळे यांनी पाहणी केली. शेतातील सोयाबीन या पिकाची दुरावस्था झाली असून पाण्याअभावी पूर्ण पीक करपून गेले आहे. श्री. बावनकुळे म्हणाले की, शासनाने तत्काळ पंचनामे करण्याचे आदेश दिले असून संपूर्ण यंत्रणा आता पंचनामे करीत आहे. अचूक पंचनामे करून शेतकऱ्यांना अधिक मोबदला कसा देता येईल, यासाठी शासन प्रयत्नशील आहे. लवकरात लवकर शेतकऱ्यांना मोबदला मिळावा यासाठीही शासनाचे प्रयत्न सुरू आहेत, असे श्री. बावनकुळे यांनी शेतकऱ्यांशी बोलताना सांगितले.

वाडिया रुग्णालयामुळे मालेगावकरांना दर्जेदार आरोग्यसेवा : मंत्री दादाजी भुसे

■ मालेगाव (दै. संध्या)

मालेगाव महानगरपालिकेच्या माध्यमातून साकारण्यात आलेल्या वाडिया रुग्णालयामुळे शहरातील नागरिकांना विशेषतः गरीब व गरजू रुग्णांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध होणार आहे. रुग्णालयासाठी आवश्यक वैद्यकीय साहित्य, तज्ज्ञ डॉक्टर तसेच शासनाच्या विविध आरोग्य योजनांचा लाभ उपलब्ध करून देण्यासाठी शासनस्तरावर आवश्यक सहकार्य केले जाईल, असे प्रतिपादन राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी केले.

महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीचे औचित्य साधून वाडिया रुग्णालयाचा लोकार्पण सोहळा आज मंत्री दादाजी भुसे यांच्या हस्ते झाला. यावेळी ते बोलत होते. यावेळी मालेगाव शहर महापालिकेच्या महापौर शेख नसरीन बानो मो. खालिद, महानगरपालिका आयुक्त रवींद्र जाधव, वैद्यकीय अधीक्षक (वर्ग 1) डॉ. जितेंद्र डोलारे, उपमहापौर शाने हिंद निहाल अहमद, स्थायी समितीच्या सभापती एजाज बेग, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती शेख ताहेरा शेख रशीद, शहर अभियंता कैलास बच्छाव, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता शांताराम चौरे, वास्तु विशारद जयश्री आहेर यांच्यासह आरोग्य अधिकारी, कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.

मंत्री श्री. भुसे म्हणाले, वाडिया रुग्णालयाला



मालेगावच्या सामाजिक जीवनात मोठा इतिहास आहे. शहराची लोकसंख्या कमी असतानाच्या काळापासून या रुग्णालयाशी मालेगावकरांचे जिव्हाळ्याचे नाते राहिले आहे. अनेक कुटुंबांना या रुग्णालयातून आरोग्यसेवा मिळाली आहे. कोरोना महामारीच्या काळात आरोग्य सुविधांचे महत्त्व प्रकर्षाने समोर आले. नागरिकांना त्यांच्या परिसरातच चांगली आरोग्यसेवा उपलब्ध होणे आवश्यक आहे. रुग्णालयात येणाऱ्या प्रत्येक रुग्णाला योग्य तपासणी, उपचार व आवश्यक सुविधा मिळाव्यात, यासाठी प्रशासनाने प्रयत्नशील राहावे, असेही त्यांनी सांगितले.

चांगला प्रकल्प उभारल्यानंतर त्याची देखभाल व जतन करणे ही मोठी जबाबदारी आहे. वाडिया रुग्णालय स्वच्छ व सुंदर ठेवण्याची जबाबदारी महानगरपालिका प्रशासनासोबतच मालेगावकर नागरिकांचीही आहे.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर जलसंधारण, पाणीटंचाई निवारणाची कामे करावीत : जिल्हाधिकारी येरेकर

■ अमरावती (दै. संध्या)

यंदाच्या मान्सूनचा कालावधी संपला असून यापुढे पावसाची शक्यता नाही. येत्या काळात पाणीटंचाईचे स्वरूप जाणवणार आहे. त्यामुळे सध्या निर्माण झालेल्या वैश्विक संकटाचा सामना करण्यासाठी जलसंधारण आणि पाणीटंचाई निवारणाच्या कामांवर सर्व यंत्रणांनी एकत्रितपणे भर द्यावा, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात तालुका दुष्काळ निवारण व व्यवस्थापन आराखडा कार्यशाळा आज पार पडली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी, उपविभागीय अधिकारी सिद्धार्थ शुक्ला, उपवनसंरक्षक के. अर्जुना उपस्थित होते. दुष्काळी परिस्थितीबाबत करावयाच्या उपाययोजनांची सुमारे नऊ तास विविध विभागांशी चर्चा करण्यात आली.

जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी, तालुकानिहाय दुष्काळाची स्थिती जाणून घेतली. त्यासोबतच जिल्ह्यात उपलब्ध असलेला चारा आणि भविष्यात शासनाच्या प्रयत्नातून चाऱ्याचे उत्पादन वाढविण्याबाबत चर्चा केली. सद्यस्थितीत जिल्ह्यात पुरेसा चारा उपलब्ध आहे. शासनाच्या पुढाकारातून गाळपेर जमीन किंवा शासनाच्या जागा उपलब्ध



करून चारा उपलब्ध करून शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न करण्यात येईल. त्यासोबतच उपलब्ध असलेल्या पाणीसाठ्यावर कमी पाण्यात रब्बीची पिके घेणे शक्य आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना गव्हापेक्षा हरभरा, मोहरी आदी कमी पाण्यावर येणाऱ्या पिकांकडे वळविण्याचे आवाहन त्यांनी केले.


मान्सूनचा कालावधी संपलेला असल्यामुळे जलसंधारणाची कामे तातडीने सुरू करता येणे शक्य आहे. ही कामे आतापासूनच सुरू केल्यास येत्या मान्सूनमध्ये अपुरा पाऊस पडला तरी यातून जलपुनर्भरणाची कामे चांगल्या पद्धतीने होऊ शकणार आहे. त्यामुळे सर्व विभागांनी समन्वयाने कामे करून जलसंधारणाच्या कामाला तातडीने सुरुवात करावी. अल निनो हे वैश्विक संकट आहे. मात्र या संकटाचा सामना संधी म्हणून करण्याचा दृष्टिकोन सर्व विभागांनी करावा. पिके घेण्याच्या पद्धतीत बदल ते जैविक शेती पद्धतीबाबत शेतकऱ्यांमध्ये जागरूकता करावी लागणार आहे. त्यासोबतच जलसंधारणाची कामे करताना शेततळे, गाळमुक्त धरण ही कामे तातडीने सुरू करावी. शासनाच्या एकत्रित प्रयत्नामुळे दुष्काळाची झळ कमी होण्यास निश्चितच मदत होईल, असे श्री. येरेकर यांनी यावेळी सांगितले.



दैनिक संध्या
निःपक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक
रविवार, दि. ०४ ऑक्टोबर २०२६

पुणे शहर व जिल्हा

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews



थोडक्यात पण महत्वाचे



महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंती निमित्त प्रशासनाकडून अभिवादन

बारामती : दैनिक संध्या

राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंती निमित्त निवासी नायब तहसीलदार नामदेव काळे यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. तहसिल कार्यालयात आयोजित कार्यक्रमात नायब तहसिलदार भारत भिसे यांच्यासह कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती उत्साहात साजरी

गोजुबावी : दैनिक संध्या

रयत शिक्षण संस्थेचे न्यू इंग्लिश स्कूल,गोजुबावी येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ.वैशाली बेंडसुरे मॅडम यांच्या हस्ते महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.यावेळी विद्यार्थ्यांनी दोन्ही महापुरुषांच्या जीवनकार्याची व देशासाठी दिलेल्या योगदानाची माहिती सांगितली. जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांनी शाळेच्या परिसराची स्वच्छता करून 'स्वच्छ शाळा, सुंदर शाळा' हा संदेश दिला.विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत परिसर स्वच्छ व सुंदर ठेवण्याचा संकल्प केला. या कार्यक्रमास विद्यालयातील शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना स्वच्छता,साधेपणा,सत्य,अहिंसा आणि देशसेवेचे महत्त्व समजले.



कर्मवीर जयंतीनिमित्त कार्यक्रम उत्साहात

गोजुबावी : दैनिक संध्या

रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल,गोजुबावी येथे कर्मवीर भाऊराव पाटील जयंतीनिमित्त सभेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. मचाले सर होते.यावेळी स्कूल कमिटीचे सदस्य नारायण दादा जाधव,तानाजी जाधव,कल्याणराव आटोळे,देणगीदार बाबासो गटकळ,साहेबराव गटकळ, विद्यालयास पाच हजार रुपये किमतीच्या वह्या विद्यार्थ्यांना देणारे श्री.सागर भाऊसो जाधव,माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष विकास नाना आटोळे,गोरख लांबाते, पत्रकार कृष्णमूर्ती जगताप,प्रविण माकर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते कर्मवीर भाऊराव पाटील,लक्ष्मीबाई पाटील आणि अजितदादा पवार यांच्या प्रतिमांचे पूजन करून दीपप्रज्वलन करण्यात आले.मुख्याध्यापिका सौ.वैशाली बेंडसुरे यांनी प्रास्ताविक केले.प्रमुख वक्ते श्री. सरतापे सर यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जीवनकार्यावर मार्गदर्शन केले. जयंतीनिमित्त आयोजित वक्तृत्व, निबंधलेखन,ग्रंथ प्रदर्शन चित्रकला, क्रीडा आणि रांगोळी स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.विजेत्यांना प्रशस्तिपत्रक व गुलाबपुष्प देऊन गौरविण्यात आले. तसेच इयत्ता दहावीतील प्रथम तीन क्रमांकाच्या विद्यार्थ्यांना माजी शिक्षक श्री.अंकुश शिंदे यांच्या सौजन्याने ट्रॉफी देण्यात आल्या. अध्यक्षीय भाषणात श्री.मचाले सर यांनी विद्यार्थ्यांनी कर्मवीरांच्या विचारांचा आदर्श घेत प्रामाणिकपणा,शिस्त,परिश्रम आणि सामाजिक जाणीव जोपासावी,असे आवाहन केले. कार्यक्रमास शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी,विद्यार्थी,पालक,माजी विद्यार्थी संघाचे सदस्य आणि ग्रामस्थ उपस्थित होते. सूत्रसंचालन शिक्षकांनी केले,तर आभार प्रदर्शनानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

सेमीकंडक्टर संशोधनाला उद्योग-शिक्षणाची जोड आवश्यक

उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांचे प्रतिपादन; 'एनएक्सपी इंडिया'चा २०वा वर्धापन दिन उत्साहात

■ पुणे (दै. संध्या)



"सेमीकंडक्टर क्षेत्रात भारताची भूमिका वेगाने विस्तारत असून, आगामी काळात या क्षेत्रात मोठ्या संधी निर्माण होणार आहेत. या संधींचा लाभ घेण्यासाठी संशोधन, नवकल्पना आणि कुशल मनुष्यबळ निर्मितीवर भर देण्याची गरज आहे. त्यासाठी उद्योग आणि शैक्षणिक संस्थांमधील समन्वय अधिक मजबूत करावा. यामध्ये भारतीय अभियंत्यांचे योगदान उल्लेखनीय राहणार असून, एनएक्सपीने संशोधनाची ही गती कायम ठेवावी," असे प्रतिपादन राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले.

सेमीकंडक्टर क्षेत्रातील अग्रणी 'एनएक्सपी इंडिया' संस्थेच्या २० व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात पाटील बोलत होते. यावेळी 'एनएक्सपी इंडिया'चे पुणे साइट हेड आशिष भट्टड, कंपनीचे संचालक, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी पाटील यांनी कंपनीतील विविध उत्पादनांची पाहणी करत सचिन पत्की आणी पुष्कर सुदामे यांच्याकडून माहिती घेतली. 'एनएक्सपी इंडिया' ही 'एनएक्सपी सेमीकंडक्टर्स'ची भारतातील प्रमुख संशोधन, विकास व डिझाइन उपकंपनी आहे. चंद्रकांत पाटील म्हणाले, "गेल्या दोन दशकांत 'एनएक्सपी इंडिया'ने ऑटोमोटिव्ह आणि तंत्रज्ञान क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. आज तंत्रज्ञान हा पर्याय राहिलेला नसून तो जीवनाचा अविभाज्य भाग झाला आहे. सेमीकंडक्टर क्षेत्राच्या विकासासाठी केंद्र सरकार विविध पातळ्यांवर काम करीत आहे. या प्रयत्नांना उद्योग क्षेत्राने संशोधन आणि नवकल्पनांच्या माध्यमातून बळ द्यावे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारत २०४७ पर्यंत विकसित भारताच्या दिशेने वाटचाल करीत आहे. या प्रवासात सेमीकंडक्टर क्षेत्राची भूमिका महत्त्वाची राहणार आहे." आशिष भट्टड म्हणाले, "कोणत्याही संस्थेसाठी २० वर्षांचा प्रवास हा आनंददायी असतो. कंपनीच्या वाटचालीत आणि यशामध्ये सर्वात महत्त्वाचा वाटा हा कंपनीतील कर्मचाऱ्यांचा असतो. पुणे हे शिक्षण, इंजिनिअरींग आणि इनोव्हेशनचे हब असल्याने येत्या २० वर्षात कंपनीचा आणखी विकास होण्याची संधी आहे. येत्या काळात एआय, ऑटोमोटीव्ह, कनेक्टीव्हीटी आणि सेमीकंडक्टर टेक्नॉलॉजीमध्ये कंपनी आणखी मोठे योगदान देईल." कुशल मनुष्यबळाच्या निर्मितीसाठी 'एनएक्सपी'ने अभियांत्रिकी महाविद्यालयांशी अधिक समन्वय साधावा. उद्योगातील प्रत्यक्ष अनुभव, संशोधनाच्या संधी आणि आवश्यक कौशल्यांची माहिती विद्यार्थ्यांना मिळाल्यास त्यांना करिअरची योग्य दिशा मिळेल, असे पाटील यांनी नमूद केले. वृषाली मोदी यांनी स्वागत केले. प्राची जोशी व देवयानी गोडबोले यांनी सूत्रसंचालन केले. ऋषिकेश सबनीस यांनी आभार मानले.

आयुर्वेद परंपरा व उपचारपद्धतीच्या विस्तारासाठी जागतिक संवाद वाढावा

जगभरातील आयुर्वेद तज्ज्ञांची अपेक्षा; डॉ. हरीश पाटणकर यांच्या पुढाकारातून 'ग्लोबल संवाद २०२६'चे आयोजन

■ पुणे (दै. संध्या)



आयुर्वेदाचे महत्व जागतिक स्तरावर अधिक व्यापक होण्यासाठी, तसेच भारतीय आयुर्वेद परंपरेचा प्रसार होण्यासाठी आयुर्वेदावर काम करणाऱ्या तज्ज्ञांमध्ये संवाद वाढला पाहिजे, अशी अपेक्षा जगभरातील आयुर्वेद तज्ज्ञांनी व्यक्त केली. पुण्यातील आयुर्वेदाचार्य डॉ. हरीश पाटणकर यांच्या संकल्पनेतून व पुढाकारातून अकराव्या जागतिक आयुर्वेद दिनाच्या निमित्ताने आयुर्वेदाच्या जागतिक विस्ताराला व्यापक व्यासपीठ देणाऱ्या 'ग्लोबल संवाद २०२६' या विशेष व्हर्च्युअल संवादाचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते. लंडनहून झालेल्या या परिसंवादामध्ये २५ हून अधिक देशांतील ५०० डॉक्टर, आयुर्वेदतज्ज्ञ, संशोधक व क्षेत्रातील मान्यवरांनी सहभाग नोंदवला. 'वन वर्ल्ड, वन डायलॉग: द लॅग्वेज ऑफ हेल्थ' या संकल्पनेवर आधारित प्राचीन संहिता गुरुकुल आयोजित या ग्लोबल संवादामध्ये भारतासह इंग्लंड, जर्मनी, क्रोएशिया, ऑस्ट्रेलिया, दुबई, आयर्लंड, फिलिपिन्स, स्लोव्हेनिया, नेदरलँड्स, नेपाळ यांसह २५ हून अधिक देशांतील आयुर्वेद क्षेत्रातील प्रतिनिधी सहभागी झाले होते. विविध देशांमध्ये आयुर्वेदाचा प्रत्यक्ष अनुभव घेत असलेल्या चिकित्सकांना, तज्ज्ञांना आणि क्षेत्रातील नेतृत्वाला एकाच व्यासपीठावर आणणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

या उपक्रमाबाबत केशायुर्वेदचे डॉ. हरीश पाटणकर म्हणाले, "जगाच्या विविध भागांत आयुर्वेदावर काम करणाऱ्या व्यक्तींचे अनुभव एकत्र येणे, परस्परांच्या कार्यपद्धती समजून घेणे आणि भविष्यातील सहकार्याच्या शक्यता निर्माण करणे, हा ग्लोबल संवादाचा व्यापक दृष्टिकोन आहे. भारतातील आयुर्वेदाची परंपरा आणि जागतिक स्तरावर त्याचा विस्तार यांच्यातील संबंध या निमित्ताने अधोरेखित झाला." केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांच्यासह राष्ट्रीय आयुर्वेद संस्थेतील प्राध्यापिका डॉ. मीता कोटेचा, इन्स्टिट्यूट ऑफ टिचिंग अँड रिसर्च इन आयुर्वेदाच्या संचालिका डॉ. तनुजा नेसरी आणि राष्ट्रीय आयुर्वेद विद्यापीठाच्या डॉ. वंदना सिरोहा यांनी मार्गदर्शन केले. जागतिक स्तरावर वैद्यकीय सेवा करीत असलेले डॉ. विनायक अब्बोट, डॉ. कांचन शर्मा, डॉ. राज सातपुते, डॉ. प्रशांत खाडे, डॉ. मिलिंद जानी आणि डॉ. चैत्राली पाटील यांनी विविध देशांतील आणि विविध कार्यक्षेत्रांतील अनुभव मांडले. विशेषतः परदेशात आयुर्वेदाचा अभ्यास, चिकित्सा आणि प्रसार करताना येणाऱ्या संधी व व्यावहारिक आव्हानांचा या संवादातून वेध घेण्यात आला.

कुरकुंभ येथे अवयवदान जनजागृती कार्यक्रम उत्साहात

■ पुणे (दै. संध्या)



वैद्यकीय प्रशासन अधिकारी, पुणे यांच्या अंतर्गत सेवा दवाखाना, कुरकुंभ येथे 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत अवयवदान जनजागृती कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. वैद्यकीय अधिकारी डॉ. सिराजुद्दीन जमादार यांनी "अवयवदान हे केवळ दान नसून, एखाद्या गरजू व्यक्तीला नवजीवन देण्याची अमूल्य संधी आहे," समाजामध्ये अवयवदानाबाबत सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले.

यावेळी औषध निर्माता अजिंक्य देसाई यांनी अवयवदानाचे महत्त्व, अवयवदानामुळे गरजू रुग्णांना मिळणारे जीवनदान आणि समाजामध्ये अवयवदानाबाबत व्यापक जनजागृती निर्माण करण्याची आवश्यकता याविषयी मार्गदर्शन केले. अवयवदानाबाबत समाजात असलेल्या विविध गैरसमजुती दूर करून अधिकाधिक नागरिकांनी या मानवतावादी उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

अवयवदानाच्या जनजागृतीसाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अवयवदानाचे महत्त्व, अवयवदानाची प्रक्रिया आणि त्यातून मिळणारे जीवनदान याविषयी विविध माहितीपूर्ण पोस्टर्स तयार करून प्रदर्शनीद्वारे माहिती देण्यात आली. या माध्यमातून उपस्थितांना अवयवदानाबाबत आवश्यक माहिती देण्यात आली. अधिकारी, कर्मचारी आणि विमाधारकांचा कार्यक्रमाला सकारात्मक प्रतिसाद मिळाला.

गांधी जयंतीनिमित्त दौंडमध्ये स्वच्छता अभियान

■ पुणे (दै. संध्या)



राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी दिलेल्या स्वच्छता, सेवा आणि सामाजिक बांधिलकीच्या विचारांना कृतीची जोड देत गांधी जयंतीनिमित्त दौंड शहरात 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात आले. या अभियानांतर्गत मंडई ते गांधी चौक परिसरात विशेष स्वच्छता मोहीम राबवून नागरिकांना स्वच्छतेचा आणि सामाजिक जबाबदारीचा संदेश देण्यात आला. या उपक्रमात दौंड नगरपरिषद, रोटरी क्लब ऑफ दौंड, धन निरंकारी सेवा संस्था आणि संस्कार स्कूल यांनी सहभाग घेतला. नगरपरिषदेचे अधिकारी, कर्मचारी तसेच सफाई कामगारांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवत सार्वजनिक परिसर स्वच्छ करण्यासाठी योगदान दिले. गांधी जयंतीनिमित्त राबविण्यात आलेल्या या अभियानातून 'स्वच्छता ही केवळ एका दिवसाची मोहीम नसून प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे', हा प्रभावी संदेश देण्यात आला. सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता राखण्यासाठी नागरिक, सामाजिक संस्था, शैक्षणिक संस्था आणि प्रशासन यांनी एकत्रितपणे काम केल्यास स्वच्छ व सुंदर दौंडची संकल्पना अधिक प्रभावीपणे साकार होऊ शकते, यावर यावेळी भर देण्यात आला.

my
■ बुकमायशोवर २०२६ मधील भव्य दांडिया-गरबा उत्सवांची रेलचेल

पुण्यात नवरात्रीचा जल्लोष

■ पुणे (दै. संध्या)

दांडियाच्या टिपऱ्या हातात घेताच पुणेकरांमध्ये नवरात्रीचा उत्साह संचारतो. यंदाच्या नवरात्रीसाठी भारतातील आघाडीचे मनोरंजन व्यासपीठ बुकमायशोने पुण्यातील विविध भव्य गरबा आणि दांडिया उत्सवांची माहिती उपलब्ध करून दिली आहे. जोशपूर्ण गरबा, दांडिया, लाईव्ह संगीत, ढोल-ताशांचा गजर, प्रसिद्ध कलाकारांची उपस्थिती, खाद्यपदार्थांचे स्टॉल्स आणि आकर्षक सजावट अशा विविध अनुभवांनी पुण्यातील नवरात्री रंगणार आहे. बुकमायशोवर देशभरातील १००० हून अधिक नवरात्री कार्यक्रम आणि २० हून अधिक बँक ऑफर्स उपलब्ध असल्याचे सांगण्यात आले आहे.

पुण्यातील प्रमुख आकर्षणांमध्ये दांडिया धूम ९.०चा समावेश आहे. बालेवाडी येथील द ऑर्किड हॉटेलमध्ये १६ ते १८ ऑक्टोबरदरम्यान होणाऱ्या या तीन दिवसीय उत्सवात 'तारक मेहता का उल्टा चष्मा' मालिकेतील लोकप्रिय कलाकार दिलीप जोशी आणि मयूर वकानी यांच्यासह रॉकिंग गोली सहभागी होणार आहेत. बॉलिवूड संगीत, गुजराती लोकधून आणि जोशपूर्ण दांडियामुळे या उत्सवाला रंगत येणार आहे.

खराडी येथील महालक्ष्मी लॉन्समध्येही दांडिया धूम ९.०चे आयोजन करण्यात आले आहे. 'मिर्ची रॉक एन ढोल'च्या साथीने होणाऱ्या या उत्सवात पारंपरिक गरबा-दांडियासोबत बॉलिवूड संगीत, गुजराती लोकसंगीत, दमदार डीजे सादरीकरण, खाद्यपदार्थांचे स्टॉल्स, मनोरंजनाचे विभाग आणि छायाचित्रणासाठी आकर्षक ठिकाणे उपलब्ध असतील.

रास रंग दांडिया ४.० हा पुण्यातील प्रमुख खुल्या मैदानावरील गरबा उत्सवांपैकी एक असून, बीएचएस ओपन ग्राउंड येथे १६ ते १८ ऑक्टोबरदरम्यान त्याचे आयोजन करण्यात आले आहे. ताऱ्यांच्या साक्षीने होणाऱ्या या उत्सवात पारंपरिक गरबा, लाईव्ह ढोल, बॉलिवूड-गरबा संगीत आणि रंगीबेरंगी सजावटीचा अनुभव घेता येणार आहे.

दांडिया रास ४.०साठी एल्प्रो सिटी स्क्वेअर येथे नऊ रात्रींच्या उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. ११ ते १९ ऑक्टोबरदरम्यान होणाऱ्या या कार्यक्रमात लाईव्ह संगीत, डीजे, आकर्षक सजावट, खाद्यपदार्थांचे स्टॉल्स आणि मध्यरात्रीपर्यंत सुरू राहणारा गरबा यामुळे उत्सवाचे वातावरण रंगणार आहे.

'इएलटीएआय' आंतरराष्ट्रीय परिषद ७ ते १० ऑक्टोबरदरम्यान

कृत्रिम बुद्धिमत्ता, एनईपी २०२० आणि बदलत्या शिक्षणपद्धतींवर होणार चर्चा



■ पुणे (दै. संध्या)

कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) शिक्षण क्षेत्रावर वाढता प्रभाव, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) २०२०, बहुभाषिक शिक्षण आणि बदलत्या अध्यापन पद्धतींच्या पार्श्वभूमीवर इंग्रजी भाषा व साहित्य शिक्षणाच्या भवितव्यावर पुण्यात जागतिक स्तरावर मंथन होणार आहे. भारतीय इंग्रजी भाषा शिक्षक संघटना (ELTAI) आणि एमआयटी आर्ट, डिझाइन अँड टेक्नॉलॉजी (एमआयटी-एडीटी) विद्यापीठ, लोणी-काळभोर, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने 'इएलटीएआय'ची २० वी आंतरराष्ट्रीय आणि ५६ वी वार्षिक परिषद ७ ते १० ऑक्टोबर २०२६ दरम्यान आयोजित करण्यात आली आहे.

एमआयटी-एडीटी विद्यापीठातील स्कूल ऑफ ह्युमॅनिटीज आणि स्कूल ऑफ होलिस्टिक डेव्हलपमेंट यांच्या यजमानपदाखाली होणाऱ्या या चार दिवसीय परिषदेत भारतातील जवळपास १,००० इंग्रजी शिक्षक व प्रतिनिधी, तसेच नेपाळ, बांगलादेश, इराक, उझबेकिस्तान, मलेशिया आणि थायलंडसह विविध देशांतील ५० हून अधिक आंतरराष्ट्रीय विद्वान सहभागी होणार आहेत. 'English on the Edge: Survive? Evolve? Thrive?' या मध्यवर्ती विषयावर परिषदेत विविध सत्रांमधून इंग्रजी शिक्षणाच्या बदलत्या स्वरूपाचा वेध घेतला जाणार आहे.

या परिषदेचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री श्री.चंद्रकांत पाटील, ब्रिटिश कौन्सिलचे उपसंचालक शॅनन वेस्ट, केंब्रिज विद्यापीठाचे दक्षिण आशिया संचालक टी. के. अरुणाचलम, इंग्लिश अँड फॉरेन लँग्वेजेस विद्यापीठ, हैदराबादचे कुलगुरु प्रा. डॉ. एन. नागराजू, एमआयटी एडीटी विद्यापीठाचे कार्याध्यक्ष प्रा.डॉ.मंगेश कराड, कुलगुरु प्रा. डॉ. राजेश एस यांच्या उपस्थितीत होणार आहे.

तर परिषदेच्या समारोप समारंभासाठी केंद्रीय सहकार आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री खा.मुरलीधर मोहोळ यांची उपस्थिती लाभणार असल्याची माहिती, आयोजित पत्रकार परिषदेत विद्यापीठाच्या प्रोवोस्ट प्रा. डॉ.सायली गणकर यांनी दिली.

जनरेटिव्ह एआयच्या माध्यमातून लेखन, भाषांतर, वाचन, मूल्यमापन आणि अध्यापनाच्या पद्धतींमध्ये झपाट्याने बदल होत आहेत. त्याचवेळी उच्च शिक्षणातील अभ्यासक्रमातील बदल, बहुभाषिक वर्ग, तंत्रज्ञानाचा वाढता वापर आणि शिक्षकांकडून असलेल्या नव्या अपेक्षांमुळे इंग्रजी शिक्षणासमोर नवी आव्हाने निर्माण झाली आहेत. या पार्श्वभूमीवर इंग्रजी शिक्षणाने बदलत्या तंत्रज्ञानाशी जुळवून घेताना मानवी सर्जनशीलता, चिकित्सक विचार आणि संवादकौशल्य यांचे महत्त्व कसे टिकवावे, यावर परिषदेत चर्चा होणार आहे, असेही डॉ.गणकर यावेळी म्हणाल्या.

एमआयटी-एडीटी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.महेश चोपडे म्हणाले, "जगभरातील विद्वानांना एकाच व्यासपीठावर आणल्यामुळे शैक्षणिक धोरण आणि प्रत्यक्ष अध्यापन यांच्यातील दुवा अधिक मजबूत होईल. भारतीय आणि जागतिक शिक्षणव्यवस्थेसाठी ही चर्चा महत्त्वपूर्ण आहे."

स्कूल ऑफ होलिस्टिक डेव्हलपमेंटचे (एसएचडी) संचालक व स्कूल ऑफ ह्युमॅनिटीजचे अधिष्ठाता डॉ.अतुल पाटील म्हणाले, "एआय वाचू, लिहू, भाषांतर करू आणि अध्यापनाची नक्कल करू शकत असताना इंग्रजी शिक्षणातील माणूस म्हणून आपले वेगळेपण काय राहते, हा मूलभूत प्रश्न आज आपल्यासमोर आहे. बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्यासाठी, नव्या कल्पना स्वीकारण्यासाठी आणि नेतृत्व करण्यासाठी शिक्षकांना सक्षम करणे हे या परिषदेचे प्रमुख उद्दिष्ट आहे."

परिषदेत संशोधन सादरीकरणे, परस्परसंवादी कार्यशाळा, परिसंवाद, पॅनेल चर्चा आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. संशोधक आणि शिक्षकांना स्कोपस-सूचीबद्ध पीटर लँग प्रकाशनांसह जर्नल ऑफ इंग्लिश लँग्वेज टीचिंग (JELT) आणि जर्नल ऑफ टीचिंग अँड रिसर्च इन इंग्लिश लिटरेचर (JTREL) यांसारख्या नियतकालिकांमध्ये संशोधन प्रकाशित करण्याच्या संधी उपलब्ध होणार असल्याची माहिती 'इएलटीएआय'चे राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ.किशोर सेलवा बाबू यांनी दिली.

वाचन संस्कृती रुजविण्यासाठी 'रिड फेस्ट'

परिषदेबरोबरच वाचन संस्कृतीपासून दूर चाललेल्या तरुणाईसाठी 'रिड फेस्ट' अर्थात वाचन महोत्सवाचेही विशेष आयोजन करण्यात आले आहे. त्याचे उद्घाटन समाजिक कार्यकर्ते पद्मश्री गिरिश प्रभुणे यांच्या हस्ते होणार आहे. वाचनाची आवड निर्माण करणे, पुस्तकांशी विद्यार्थ्यांचे नाते दृढ करणे आणि वाचनसंस्कृतीला चालना देणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. यामध्ये विविध वर्तमानपत्रांचे, पुस्तक प्रकाशकांचे आणि विद्यार्थ्यांचे स्टॉल असणार आहेत. पारंपरिक वाचन साधनांपासून दूर चाललेल्या पिढीसाठी हा उपक्रम दिशादर्शक ठरणार आहे.

"तंत्रज्ञानातील वेगवान बदलांना सामोरे जाण्यासाठी विद्यार्थ्यांसह शिक्षकांनाही सक्षम करणारे सर्वांगीण आणि मूल्याधिष्ठित शिक्षण ही विद्यापीठाची भूमिका आहे. एआयच्या युगात मानवविद्याशाखांच्या भवितव्याबाबत नव्या दिशा आणि उपाय शोधण्यासाठी ही परिषद महत्त्वपूर्ण ठरेल."

- प्रा. डॉ. मंगेश कराड, प्र-कुलपती तथा कार्याध्यक्ष, एमआयटी-एडीटी विद्यापीठ, पुणे